बाधे न तें सर्व लयास जाई ।।
२४ हवि ब्रह्म, तें अग्नित ब्रह्मरूपी ।
स्वयें ब्रह्म तें ब्रह्मकर्मी समर्पी ।
दिसे ब्रह्म सर्वत्र ऐसें जयाला ।
विरे ब्राह्मिची आंतें शंका कशाला ? ।।
२५ कर्मयोगी दुजे यज्ञें करिती देवतांस्तव ।
ब्रह्माग्नीत दुजे, यज्ञें यजिती यज्ञ पांडव ।।
२६ श्रोत्रादि इंद्रिये कोणी हविती संयमानलीं ।
शब्दादि-विषया कांहीं, योगी ते संयमानलीं ।।
२७ व्यापार इंद्रियांचे नी प्राणांचे सर्व कांहिं ते ।
अर्पिती ज्ञान-दीप्तातें आत्मसंयमवन्हितें ।।
२८ योग-द्रव्य-तपो-ज्ञान-स्वाध्यायादिक-रूप ते ।
यज्ञ आचरती योगी कांहीं निश्चल जे व्रतें ।।
२९ प्राणायाम-पर, प्राणापान-संचार रोधुनी
प्राणीं अपान, नि प्राण अपानीं होमिती कुणी ।।
३० प्राणांत प्राणही कोणी ते मिताहारि होमिती ।
हे सारे यज्ञवेत्ते, कीं, यज्ञ तत्पाप नाशिती ।।
३१ पावती शाश्वतब्रम्हा, सेवुनी यज्ञशेष ते ।
अ-यज्ञा सुख ना येथें, परलोकीं कुठून तें ? ।।
३२ ब्रम्हाचे वदनीं ऐसे यज्ञ बहुविध चालती ।
कर्मोद्भवचि ते सारे, या ज्ञानें तुज सद्गती ।।
३३ ज्ञानांत सर्व कर्मांचा, पार्था, कीं अंत होतसे ।
द्रव्ययज्ञाहुनी श्रेष्ठ ज्ञान-यज्ञ परी असे ।।
३४ संपादि तें, ज्ञानि-जनांकडूनी । सेवूनि, शंका पुसुनी, नमूनी ।
यथार्थ त्यां तत्त्व तयांमधील । कळे; तुला ते उपदेशितील ।।
३५ हे पांडवा यापरि, जाणतां हें
तूं ग्रस्त होशील पुन्हां न मोहें ।
दिसेल तेणें तुज भूत-जात
स्वतांत आणि मज ईश्वरांत ।।
३६ जे पातकी या जगिं मोठमोठे
त्यांच्याहुनीही तव पाप मोठें ।
असो; तुला त्यांतुनि पैलतीरा
नेईल ही ज्ञान-तरीच, वीरा ।।
३७ काष्ठें जशीं पातक सर्व जाळी
न मोठमोठीं वगळी निराळीं ।

ज्ञानाग्नि, कर्मँ सगळीं, किरीटी
तशींच, बा, भस्म करून टाकी ॥
३८ पवित्र न ज्ञान सम त्रिलोकीं
पार्था, दुजें, हें समजून घे कीं ।
तें, काम निष्काम सदा करील
काळें तदन्तीं सहज स्फुरेल ॥
३९ सश्रद्ध जो जिंकुनि इंद्रियांतें
धरी सदा ध्यास, मिळे तयांतें ।
तें ज्ञान, जें प्राप्त नरास होतां
शांती मिळे शीघ्र अपार चित्ता ॥
४० श्रद्धा तथा ज्ञान न ज्या नरास
शंका सदा, त्या ठरला विनाश ।
या लोकिं किंवा परलोकिं त्याला
न सूख शंकाकुल–मानसाला
४१ कर्मँ फलाशेविण जे करीती
ज्ञानें तुरे संशय–लेश चित्तीं ।
जाणीव ज्या 'आपण कोण ?' याची
ते बद्ध कर्मीहि न सव्यसाची ॥
४२ अज्ञान–योगें हृदयीं रहातो
ज्ञानासिनें संशय छेदुनी तो ।
निष्काम–कर्मी रत नित्य राही
पार्था, अतां ऊठ, करी लढाई ॥

---

ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स
३६३, मंगळदास मार्केट समोर, मुंबई नं. २.

ARSA PRODUCTS

❀ होजियरी ❀ तयार कपडे ❀ फर्निशिंग फॅब्रीक्स
व इतर सर्व तऱ्हेच्या कापडाचे व्यापारी
रिटेलर्स व होलसेलर्स टे. नं. २२८४४




## डिसेंबर १९५५

**या** महिन्यांत श्री साईदर्शनासाठीं बाहेर गांवचे भक्तांची फार गर्दी झाली. नाताळचे सुटींत भयंकर गर्दी मुंग्यांसारखी झाली, अनेक कलाकारांनीं श्री पुढे हजेरी दिली. त्यांतील कांहीं कार्यक्रम पुढील प्रमाणेंः—

**कीर्तन** :—श्री. ह. भ. प. विठ्ठलबुवा देवरस, नागपूर. द. दा. ऊर्फ नानासाहेब रासने, श्री. मराठे, सं. गवई, यांचीं का. ११ ला व मार्गशीर्ष शु० ११ ला अशीं दोन कीर्तनें झालीं. श्री. श्री बा. ऊर्फ बाबुराव देव, ठाणें यांचे श्री ज्ञानेश्वर पुण्यतिथिनिमित्त कीर्तन झालें.

**नृत्यें**:— के. एस. सरोजा, कु. एस' वनाजा; कु. एस. मालिनी, मु. बेझवाडा, यांनीं मणिपुरी नृत्याची हजेरी दिली. तसेंच. कु. विजया राणे, मुंबई; कु. लतिका धोतरे, मुंबई, यांनीं मणिपुरी नृत्य केलें.

**गायन**:—श्री. पंडितराव नगरकर, पुणें; श्री सौ. सुलोचना पालकर, श्री. एकनाथ चव्हाण पुणें; सौ. प्रेमलता नायक, मुंबई; श्री. रघुवीर मुकुंद कामुलकर, पुणें; श्री. विष्णु गोविंद देवकुळे पुणें; श्री. करसनलाल भावसार, मालेगांव;

**फिडल व वीणा वादन**:—सौ. सावित्रीबाई जेजुरीकर, कु. लीला जेजुरीकर, श्री. व्ही. ए. सबाई, कोल्हापूर.

**संगीत भजनी मंडळें**:—श्री. रामचंद्र नामदेव कावळेकर, (श्री. गुरुदेव भजन मंडळ, भुसावळ श्रीसाईनाथ भजनी मंडळ, खार, (मुंबई) श्री. सय्यदभाई (संगीत भजनी मंडळ, बडोदा) श्री. शिवकुमार स्वामी (श्रीसाईबाबा भजनी मंडळीं) कुर्ला; श्री. व्ही. जी. भाटकर, श्री. साटमबुवा, श्री. जमनादास श्रीज्ञानेश्वर प्रसाद भजनी मंडळ, कुर्ला

**सूर्यग्रहणानिमित्त**:—श्रींचे समाधीस अभिषेक पूजा मंगलस्नान व श्री. द. दा. ऊर्फ नानासाहेब रासने यांचे कीर्तन.

श्री. दत्त जयंतीनिमित्त श्री. मराठे सं. गवई यांचे कीर्तन रात्रौ श्रींचे रथाची गांवांतून मिरवणूक.

ना. कर्नल जगन्नाथराव भोसले यांनीं शिर्डीस येऊन श्रीसाईंचे दर्शन घेतले.

**देणग्या**—या महिन्यांत संस्थानचें धर्मार्थ दवाखान्यास देणगी रूपानें मिळाले रकमा—

| | |
|---|---|
| दि ग्रेट रॉयल सर्कस, मुंबई | रु. |
| एक भक्त | |

| | | |
|---|---|---|
| सौ. मणिबाई एच्. दस्तुर, मुंबई | रु. | २० |
| श्री. व्ही. एन्. राज, मुंबई | रु. | २५ |
| एच. फिशर अँड कंपनी लि. तर्फे श्री. के. एम्. वर्तक, खार यांचेकडून शॉर्ट वेव्ह डायाथर्मि युनिट डिलक्स मॉडेल-किंमत | रु. | ६२२५–३ |

श्री. आनंदराव ग. भाईंदरकर यांच्याकडून सरकारी रोखे किं. रु. ३०० चे मिळाले. त्यावरील ४ टक्के व्याजाचा उपयोग शिक्षणावर करण्याची इच्छा त्यांनीं प्रदर्शित केली आहे.

या महिन्यांत धर्मार्थ दवाखान्यांत एकूण १४८८ रुग्णावर उपचार करण्यांत आले.

## जानेवारी १९५६

या महिन्यांत श्रीसाईदर्शनासाठीं बाहेरगांवचें भक्त लोक बरेच आले. महिनाअखेर भक्तांची संख्या कमी होती. अनेक कलावंतानीं श्रीपुढें हजेरी दिली त्यांतील कांहीं कार्यक्रम पुढील प्रमाणें :—

**कीर्तन** :—श्री. ह. भ. प. पोपटबुवा लोहणेकर, नासिक; श्री. द. दा. ऊर्फ नानासाहेब रासने यानीं मार्गशीर्ष व॥ ११ व पौष शु. ११ अशी दोन कीर्तनें श्रीपुढें केलीं. सं. गवई मराठे यानींहि या महिन्यांत दोन कीर्तनें केलीं.

**नकला** :—श्री. गुलाब अण्णाजी कुरकुट, मु. परळी वैजनाथ यांनी फारच सुंदर नकला केल्या.

**गायन वादन** :—श्री. नामदेव भागुजी लोंढे, श्री. नारायण भागुजी लोंढे, श्री. पुंडलिक भागुजी लोंढे, श्री. बाळकृष्ण रामचंद्र बिडवे, नासिक; भिकुसा यम्मासा क्षत्रिक बिडी कारखान्यातील मंडळी, यांनी गायन वादन सुंदर केलें.

श्री. रामराव परसतवार माटुंगा, मुंबई, श्री. वामन कृष्णाजी आळतेकर, पुणे, तबलावादन, श्री. त्रिंबक केशव सोनवणे, शिरुर, सनईवादन; श्री. देविदास गणपतराव वऱ्हाड पांडे, नागपूर, गायन.

श्री. शिडीश्वर गायन मंडळी, खार, गायनवादन वगैरे श्री. बाळ तुकाराम माळी, शिखळ, श्री. मजराबाई सुंदराबाई, श्री. कमळाबाई, शिखळ, गायन. श्री नरहरबुवा व्यास. पुणे, गायन; श्री. हिंगवरबुवा कुलकर्णी, सोलापूर, गायन. कुमार दत्तात्रय हिंगवर कुलकर्णी, सोलापूर, (तबला वादन) श्री· प्रभाकर भिकाजी कुलकर्णी, नगर गायन, श्री. भैरव अनंत काळे, गायन; श्री. साहेबराव पवार, खरसुंडी, श्री. दादाराम पवार, खरसुंडी, गायन. श्री. केशव पवार खरसुंडी, (तबला वादन) श्री. त्रिंबक भिकाजी दिवेकर, पिंपळवाडी; संगीत भजन. श्री साईसमाज, गुंटुर, संगीत भजन. श्री. किसनराव बाबरे श्री. रामपूर, तबलावादन. श्री. प्रभाकर पेडणेकर, दादर हार्मोनियम वादन.

ता. २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन) झेंडा वंदन भजन कीर्तन श्री. द. दा. ऊर्फ नानासाहेब रासनें असेपर्यंत दररोज भजनात भाग घेउन भजनें म्हणून सेवा करातात.

या महिन्यात संस्थानच्या धर्मार्थ दवाखान्यास (अ) रिटायर्ड डि. जज, नागपूर, रुपये १०१; व श्री नीस डिव्हेच्या, मुंबई, रुपये २५ देणगी दाखल आले. या महिन्यात १२४० रुग्णावर उपचार करण्यात आले.

—**द. ब. राणे**, सन्मान्य चिटणीस



# श्री साईलीला

शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक

या अंकांत—


- तोच खरा सद्गुरु !
- संत तुकोबांचें जलदिव्य.
- तें अमृत आतां कोठें मिळेल ?
- उपनिषद्रहस्यांतील एक सुवर्ण-कण
- चंद्रभागेच्या कांठीं
- एक अपूर्व योग !
- भक्तसखा शामा—[श्रीसाई-गाथामृत]
- संकल्प आणि सिद्धी
- बोधिवृक्षाची हांक
- संपादकीय निवेदन, बाबांची लीला, शिरडी वृत्त वगैरे.

★

साधूंचें व्हावें संरक्षण ।
असाधूंचें समूळ निर्दळण ।
एतदर्थचि ईश्वरावतरण ।
संत हे विलक्षण यापरते ॥

ईश्वराहूनि संत मोठे ।
असाधूस आधीं लाविती वाटे ।
मन जयांचें तिळतिळ तुटे ।
प्रेम दाटे दीनार्थ ॥

—श्री साईचरित





# श्री साईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत त्रैमासिक ]

वर्ष ३३ वें : अंक २ रा

वार्षिक वर्गणी रु. २-४-० (ट. ख. सह)

एप्रिल-मे-जून १९५६

संपादक—
नागेश आत्माराम सावंत

व्यवस्थापक—
रामचंद्र महादेव राणे

कार्यालय—
ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग,
४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १

# संपादकीय निवेदन

या अंकापासून, साहित्य आणि सजावट या दोन्ही दृष्टीनें, श्री साईलीला त्रैमासिकाची पुनर्घटना करण्याचा संकल्प करून एक नवें पाऊल टाकण्याचें आम्हीं योजिलें आहे. श्री साईलीला हें नियतकालिक निघालें तें श्री सद्‌गुरु साईनाथांच्या अवतार–कार्याचा आणि त्यांच्या विश्वव्यापक आणि लोककल्याणकारक तत्त्वज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करावा याच उद्देशानें. गेलीं तेहतीस वर्षें त्या दिशेनें प्रयत्न करण्यांत खर्च झालीं आहेत. आणि म्हणूनच आज श्री, साई–तत्त्वज्ञानाचा मनापासून स्वीकार आणि पुरस्कार करणारा एक मोठा वाचकवर्ग निर्माण झाला आहे असें निश्चयानें म्हणावेसें वाटतें.

श्रीसाईबाबांचें सच्चरित्र, त्यांच्या अगाध, अतर्क्य आणि अद्‌भुतरम्य दैवी लीला, त्यांनीं स्वतःच्या आचरणांत आणून जगास शिकवलेलें सर्व–धर्म–समन्वयाचें तत्त्व, सांसारिक जीवन–कलहांत आणि संघर्षांत माणसानें कसें वागावें या विषयीं त्यांनीं आमरण केलेला हितोपदेश–या सर्व विषयांनां श्रीसाईलीलेंत प्रमुख स्थान दिलें जावें म्हणून तर हें त्रैमासिक निघालें. पण त्याच बरोबर श्रीसाई–संस्थानच्या हालचालीची, प्रगतीची आणि संयोजनेची पावलें कशीं पडत आहेत, याचाहि सर्व सामान्य श्रीसाई–भक्तांना मागोवा घेतां यावा हाहि एक या त्रैमासिकांचा दुय्यम उद्देश ठरला. त्रैमासिकांची हीं दोन प्रमुख अंगें आहेत. यांना श्रीसाई–लीलेंत प्रमुख स्थान दिलें गेलें आणि दिलें जावें या विषयीं दुमत असण्याचें कारण नाहीं.

पण आतां यानंतर श्रीसाईलीलेला पुढचा वैचारिक टप्पा गांठावयाचा आहे. १९५८ च्या नोवेम्बर वा डिसेंबर महिन्यांत श्री शिर्डी संस्थानतर्फे श्रींची शतसांवत्सरी साजरी व्हावयाची असून त्यासाठीं पूर्वतयारीहि सुरू झालेली आहे. श्रीसाईबाबांच्या शतसांवत्सरीच्या विषयावर जेव्हां जेव्हां आम्ही विचार करूं लागतों तेव्हां तेव्हां त्या एका ऐतिहासिक शतकाचें सिंहावलोकन करीत असतां आमचें हृदय अलोट भक्तिभावानें रोमांचून निघते.

श्रीसाईनाथांनीं शिर्डींत अवतार घेतला, आपलें सारें जीवन लोककल्याणार्थ वेंचून १९१८ मध्यें त्यांनीं निर्वाण केलें !. त्यांच्या मंगल नामस्मरणानें आणि पूजनानें नुसती शिर्डीच नव्हे तर सारा भारतवर्ष पुनीत होत असल्याचें विराट दृश्य आज दिसत आहे. शिर्डीला श्रींच्या दर्शनार्थ येणाऱ्या असंख्य यात्रिकांत आणि भक्तांत एक प्रकारची अनाकलनीय अशी एकात्मता आढळते. प्रदेश, वेश, भाषा, धर्म यांत वरवर दिसणारी विभिन्नता श्रींच्या चरणीं विलीन पावते आणि आम्ही सारे भारतवर्षीय एक आहोत, आमचा आत्मा एक आहे, आमचीं हृदयें एक आहेत, आमच्या पायतळींची माती आणि आमच्या माथ्या वरचें आकाश एक आहे, असा साक्षात्कार इथें घडल्यावांचून रहात नाहीं

नगर जिल्ह्यांतील कोपरगांवापासून सात आठ मैल दूर असलेल्या शिरडी नांवाच्या एका छोट्या खेड्यास आज एका महान् क्षेत्राचें, यात्रास्थानाचें महत्त्व

आणि श्रेष्ठत्व लाभलेलें आहे. गुरुपौर्णिमा रामनवमी आणि दसरा—वर्षांतल्या या तीन दिवसांना भारताच्या सांस्कृतिक आणि अध्यात्मिक पंचांगांत मानाचें स्थान मिळालें आहे! भारतांतील लक्षावधि साईभक्तांना शिर्डी हें 'मायेचें माहेर' वाटूं लागलें आहे. आपल्या जीवनांतील अवघड समस्या आणि सुखदुःखें बाबांच्यापुढें मुक्तकंठानें सांगावींत म्हणजे आपल्याला संत्रस्त करणारें ऐहिक कोडें सुटतें, एवढेंच नव्हे तर जीवनांतील अक्षुण्ण उदासीनता जाऊन मनाला नवचैतन्याची संजीवनी मिळते, जीवनाचें उत्स्फूर्त आणि उत्कर्षदायक असें नवें क्षितीज दिसूं लागतें यावर आमची नितान्त श्रद्धा आहे आणि म्हणूनच, बाहुल्या नि खेळणीं यांत रमलेलें अल्लड मूल आई दिसतांच 'आई आई' करीत तिच्याकडे धांव घेतें तद्वत या सप्तरंगी संसारांत रमलेलें आमचें मन, श्रींची नुसती आठवण होतांच 'साई साई' करीत शिर्डीकडे धांव घेऊं लागते!

श्री साईसच्चरित्र आणि श्रीसाईलीला हे, भारताच्याच नव्हे तर मानवजातीच्या सांस्कृतिक आणि अध्यात्मिक इतिहासांतले सुवर्ण संकेत आहेत. मानवी इतिहासाला मंगलमय वळण लावणाऱ्या या दिव्य घटना आहेत. तेव्हां अशा रहस्यमय विषयाचें सर्व दृष्टिकोणांतून अध्ययन, संकलन आणि समीकरण व्हावें म्हणून आतां यानंतर श्रीसाईलीलेची कांहीं पानें मुद्दाम राखून ठेवण्याचें आम्हीं ठरविलें आहे. यासाठीं लेखक आणि वाचक यांचें भरपूर सहकार्य मिळेल अशी आम्हाला आशा आहे.

●

शिर्डी संस्थान भक्तांसाठीं शक्य तितक्या सोयी करण्याची पराकाष्टा करीत असते. तथापि भक्तांची वाढती गर्दी आणि संस्थानच्या अनंत व्यावहारिक अडचणी यांची सांगड कशी घालावी हें कांहीं वेळां समजेनासे होतें. कुठून कुठून भक्त येतात, त्यांच्या राहण्याची, जेवण्याची आणि इतर सर्व सुव्यवस्था करण्यांत कुणींहि अंगचोरपणा करीत नाहीं. असें असूनहि कांहीं क्षुल्लक कारणावरून भक्तजन नाराज होतात. त्यांनीं शिर्डीसंस्थानकडे आपलेपणानें पाहून 'न्यून्य तें सरतें करोनि घ्यावें' अशी त्यांना कळकळीची विनंति आहे. भक्तांच्या निवासासाठीं आतां नवी इमारत झालेली आहे, संडास, स्नानगृहें, भोजनगृह वगैरेंत आणखीं बऱ्याच सुधारणा दिवसें दिवस होत आहेत. दवाखाना, वाचनालय, उद्यान वगैरे बाबतींत नव्या योजना भक्तजन सुचवीत असतात, त्या सर्वांचा संस्थान अगत्यानें विचार करीत आहे. उपासना, अर्चन, पूजन, अभिषेक यांच्या बाबतींत एक प्रकारची नियमबद्धता येऊं पहात आहे. तेव्हां भक्ताभक्तांत भेदाभेद केला जातो या प्रवादाला अजीबात स्थान उरूं नये असा आम्हांला भरंवसा आहे. शिर्डीला श्रींच्या दर्शनाला आलेला भक्त, चार दिवस गंमतींत घालवता येतील, अशा थिल्लर उद्देशानें येत नाहीं. एका नितान्त आवेशानें आणि अन्तःकरणाच्या ओढीनें तो येतो. त्याच्या मनांत उदात्त विचारांच्या आणि मर्मभेदक भावनांच्या असह्य ऊर्मी उसळत असतात

संपादक

येतो त्याच्या डोळ्यांतून ओसंडणारी आणि चेहऱ्यावर उसळणारी तळमळ, त्याच्या मुखावाटे बाहेर पडणारे तृप्तीचे अथवा अतृप्तीचे ऊष्ण निःश्वास आणि उश्वास, समाधीमंदिरांतून द्वारकामाईकडे, द्वारकामाईतून गुरुस्थानाकडे आणि तिथून पुढें लेंडीबागेकडे वळणारीं त्याचीं सचिंत पण तितकीच सुप्रसन्न पावलें— हें सर्व दृश्य पाहून या आर्तोची सेवा कशी आणि किती करावी असें आम्हाला होऊन जाते. पण संकल्प आणि सिद्धी यांत बाबांची इच्छा उभी आहे, हेंच खरे. कर्ते करवते ते आहेत. आम्हीं यःकश्चित अहंतेनें लिडबिडलेली माणसें, काय होणार आमच्या हातून? आणि त्याचा व्यर्थ अभिमान आणि बडिवार तरी काय म्हणून आम्ही बाळगावा! बाबांची सत्प्रेरणा मिळेल तसें घडते घडविलें जातें, हेंच खरें नव्हे काय?

●

या वर्षापासून शिर्डी संस्थानतर्फे गरजू आणि बुद्धिमान् विद्यार्थ्यांना त्यांच्या विद्यार्जनांत मदत व्हावी म्हणून शिष्यवृत्त्या आणि आर्थिक सहाय्य देण्याचें ठरलें आहे. त्यासाठीं पाच हजार रुपये वेगळे काढून ठेवण्यांत आले आहेत. ज्यांना या बाबतींत अधिक माहिती हवी असेल त्यांनीं संस्थानच्या मुंबई कार्यालयाकडे चौकशी करावी. हा प्रारंभ आहे. विद्यादान आणि अन्नदान यासारखे पुण्य नाहीं असें बाबा म्हणत. आजाऱ्याची सुश्रूषा, भुकेजलेल्या अन्नदान आणि विद्यार्जनासाठीं तडफडणाऱ्या कोवळ्या आणि निर्मळ बुद्धीला विद्यादान करणें हें मुस्थितींत असलेल्या प्रत्येक माणसाचें पहिलें कर्तव्य आहे, असें बाबा सांगत! शिष्यवृत्तीनिधींत भरपूर भर पडावी म्हणून आम्हीं ही 'बाबांची थाळी' भक्तांच्या पुढें धरीत आहों. ती अल्पावधींत भरून निघेल याबद्दल आम्हांला पूर्ण खात्री वाटतें.

●

सिकंद्राबादच्या परिसरांत 'रंगराव' नांवाचा एक इसम बाबांच्या नांवानें धुडगूस घालीत आहे, असें नुकतेंच आम्हांला समजलें आहे. पायघोळ कफनी, गळ्यांत भरघोस माळा, डोईला बाबांच्या पद्धतीचे बांधलेलें एक फडकें, हातांत एक जाडजूड सोटा, लांबरुंद दाढी, तोंडांत अभद्र वाणी असें सोंग घेऊन हा 'रंगराव' त्या बाजूस 'बाबांच्या भक्तीचें आणि बाबांच्या आशीर्वादाचें' दुकान थाटून बसलेला आहे असें कळतें. मंत्र–तंत्र–यंत्र, गंडेदोरे, पूजा अभिषेक वगैरे नाना प्रकारचें नाटक करून हा 'रंगराव' श्रद्धाळू अज्ञ भक्तांना लुबाडीत आहे अशी बातमी आहे. बाबांचा मी शिष्योत्तम आहे, बाबांच्या बरोबर हिमालयांत मी बारा वर्षें तपश्चर्या केली आहे, बाबांनीं फक्त मलाच ओंकाराचा गुरुमंत्र दिला आहे अशा अनेक थापा मारून हा 'रंगराव' भावड्या लोकांना नादीं लावीत आहे असें म्हणतात. तेव्हां अशा भोंदू नाटकी आणि अनीतिमान् लुच्च्यांचीं लक्तरें फाडून त्यांचें आंतलें किळसवाणें स्वरुप लोकांच्या पुढें मांडणें हें तेथील स्थानिक साईभक्ताचें कर्तव्य आहे असें आम्हांस वाटतें.

●

आणि म्हणूनच श्रीसाईबाबांच्या नांवाचा, प्रतिमांचा आणि चित्ररेखांचा व्यापारी व्यवहारासाठीं उपयोग कुणी करूं नये या हेतूनें शिर्डीसंस्थाननें एक ठराव केला असून त्याला आतां कायदेशीर बंधनाची मर्यादा घालण्यांत आली आहे. जो कोणी इतःपर श्रींचा फोटो वा रेखाचित्र यांचा आपल्या व्यापार उदीमासाठीं ट्रेडमार्क किंवा अन्य दृष्टीनें दुरुपयोग करील त्यावर कायदेशीर इलाज करण्यांत येईल, असा आम्हीं जाहीर इषारा देत आहोंत. या बाबतींतील कायदेशीर कलम अन्यत्र दिलें आहे. तें अवश्य वाचून वाचकांनीं या बाबतींत प्रचार करावा आणि अशा व्यवहार-दुष्टांना प्रतिबंध करण्यांत आम्हांला सहकार्य द्यावें.

●

श्रीसाईलीलेला अनेक नामंवत लेखकांचें आजवर सहाय्य मिळालेलें आहे. अशा नामवंत लेखकांत श्री. द. पां. खांबेटे यांचा प्रामुख्यानें उल्लेख करावासा वाटतो. त्यांनीं निःस्वार्थ बुद्धीनें साईलीलेला आतांपर्यंत दिलेलें सहकार्य अनमोल आहे. त्यांचे आम्ही आभार मानतो. त्यांच्या चतुरस्त्र आणि सिद्धहस्त लेखणीचा साईलीलेला यापुढेंहि निरंतर असाच लाभ मिळत राहील अशी आशा आहे.

●

यंदाचा श्रीरामनवमीचा उत्सव शिर्डी येथें दि. १८, १९ व २० या तीन दिवशीं समाधिमंदिरांत मोठ्या उत्साहानें साजरा करण्यांत आला. मंगळवारीं रात्रीं ह. भ. प. तुकारामबुवा अजगांवकर (ह. भ. प. दासगणूमहाराज यांचे शिष्य) यांचें सुश्राव्य कीर्तन झालें. ह. भ. प. तुकारामबुवांना आवाजाची निसर्गदत्त देणगी आहे. व आख्यान सांगण्याची त्यांची शैली ह. भ. प. दासगणू महाराजांची. मग आख्यान रंगले व श्रोते तल्लीन झाले हें सांगावयास नकोच. बुधवारीं ह. भ. प. अनंतराव आठवले यांचें कीर्तन झालें. आख्यान, नरसी मेहता. श्री. अनंतरावांच्या कीर्तनाकरितां श्रोते अगदीं उत्सुक असतात. ह्या दृष्टीनें उत्सव तीन दिवसांचा झाल्या कारणानें श्री. अनंतरावांचें एकच नवें कीर्तन ऐकावयास मिळालें; श्रीरामजन्माचें व काल्याचें कीर्तन हें ठरलेलेंच असतें. कोठलाहि प्रसंग विद्वत्तापूर्ण आणि रसभरित ओघवती वाणीनें रंगवून सांगण्याची कला श्री. अनंतराव यांना साधून गेली आहे.

●

गुरुवारीं, कावडीचें स्नान व अभिषेक यांची गल्लत होऊं नये म्हणून ह्या खेपेस कावडीची मिरवणूक पहांटेस ५ वाजतां घ्यावयाची असें ठरविण्यांत आलें होतें. व त्याप्रमाणें गावांत व कोपरगांवांतहि जाहीर करण्यांत आलें होतें. कांकड आरतीनंतर कावडीच्या स्नानाला सुरवात झाली. ह्या वेळेला समाधिमंदिर संपूर्ण मोकळे करून देण्यांत आलें होतें. त्यामुळें कार्यक्रम फारच व्यवस्थित रीतीनें पार पाडतां आला. ह्या वेळीं उत्सव-समीतीनें सामुदायिक अभिषेकाची प्रथा सुरूं करण्याचें ठरविलें होते. सामुदायिक अभिषेकाची ही नवी प्रथा फारच यशस्वी रीतीनें पार पडली असें भक्तांचें मत पडलें.


●

श्री रामनवमी उत्सवांत 'शिर्डीचे श्री साईबाबा' हा चित्रपट काढून बाबांच्या कीर्तीच्या प्रचारास अप्रत्यक्षपणें मदत केल्याबद्दल निर्माते श्री. केशवराव साठे, दिग्दर्शक श्री. कुमारसेन समर्थ आणि संगीत दिग्दर्शक श्री. पांडुरंग दीक्षित यांना श्रींच्या समाधीवरीले एकेक वस्त्र आशीर्वादार्थ देण्यांत आलें. त्याचप्रमाणें शिर्डी संस्थानची मुंबई कचेरी दोन अडीच वर्षे श्री. आबासाहेब राणे यांच्या जागेंत होती. त्यावेळीं त्यांनीं झीज सोसून व श्री. कृ. ज. तथा अप्पासाहेब भट ह्यांनींहि ते स्वतः त्यावेळीं समीतीचे सभासद नसतांना जी मदत केली त्याबद्दल कृतज्ञतेचें प्रतीक म्हणून वरील प्रमाणेंच श्रींच्या समाधीवरचें एकेक वस्त्र त्यांना देऊन त्यांचा सन्मान करण्यांत आला. तसेंच सभामंडप, गुरुपादुकेजवळील दुमजली इमारत, दवाखान्याचें नवीन स्वरूप, संडास, स्नानगृहें वगैरे अनेक कामें करीत असतांना आपलेंपणानें व्यवस्थापक समितीस पुष्कळ प्रकारें मदत ज्यांनीं केली ते संस्थानचे इंजीनियर श्री. दा. पु. तथा अण्णासाहेब नगरकर बी. ई. पुणें, ह्यांनाहि श्रींच्या समाधीवरचें एक आशीर्वाद वस्त्र देण्याचें ठरलें असून तो समारंभ येत्या गुरुपूर्णिमेस होणार आहे.

●

यंदाच्या उत्सवांत कीर्तनाप्रमाणेंच करमणुकीचें कार्यक्रमहि फारच चांगले झाले. कु. सिंधु ग. दाभोळकर, सौ. श्यामलाबाई मांजगांवकर, कु. मधुबाला जव्हेरी, कु. रंजना कश्यप, श्री. महाजन, श्री. बेळगांवकर, श्री. एडके, श्री. दत्तोबा गुरव प्रभृति नामवंत कलाकारांचे कार्यक्रम तर फारच बहारीचे झाले.

---



● रेशमाचा किडा आपल्याच अंगांतल्या रसाचें घर बनवून त्यांत स्वतःला कोंडून घेतो. संसारी जीवहि तसेंच आपल्याच कर्मांनीं आपल्याला बांधून घेतात. त्या किड्याचें फुलपांखरू होतें तेव्हां तें आपला कोष फोडून बाहेर येतें, तद्वत विवेक वैराग्याचा उदय झाल्यावरच बद्धजीव मुक्त होऊन जातो.



जरी हें शरीर गेलों मी टाकून। तरी मी धांवेन भक्तासाठीं ॥
जो जो, मज भजे, जैशा जैशा भावें। तैसा तैसा पावें, मीही त्यासी ॥
माझा जो जाहला काया वाचा मनीं। तयाचा मी ऋणी सर्वकाळ ॥

# बाबांची लीला

[ या अंकांत श्री बाबांच्या लीलेचे चार अनुभव आम्हीं देत आहों. ज्यांना हे अनुभव आले त्यांच्याशीं पत्रव्यवहार करून त्यांत असत्य वा अतिरंजित विधान नाहीं ना याची आम्ही पूर्ण चौकशी केली आहे. अनुभव देणाऱ्या व्यक्तींनीं आपलीं नांवें जाहीर करूं नयेत असें मुद्दाम कळविलें म्हणूनच तीं गाळलीं आहेत. साक्षात्कार, दृष्टांत किंवा अनुभूति ही वैय्यक्तिक स्वरूपाची असते. त्यांतलें पावित्र्य अवश्य राखलें जावें असें आम्हालाहि वाटतें ]

## पंगुम् लंघयते गिरीम्

मी सोलापूर जिल्ह्यांतील एक विधवा शिक्षिका आहे. माझ्या एकुलत्या एक मुलाला स्वकष्टानें मी मॅट्रीकपर्यंत शिकविलें. पण मॅट्रिक परीक्षेच्या शेवटच्या दिवशीं तो अंगांत ताप घेऊनच घरीं परतला. हातातोंडाशी आलेल्या मुलाची ती अवस्था पाहून मी घाबरून गेलें. तीन दिवस खूप उपचार केलें. त्याचा ताप गेला. पण कमरेखालचा भाग मात्र एकाएकी लुळापांगळा होऊन पडला. बरेच उपाय केलें. पण व्यर्थ. शेवटीं एका सद्गृहस्थाच्या सल्लयानें मी त्याला घेऊन शिरडीला गेले. आम्ही निवासस्थानांत उतरलो होतो. आरतीच्या वेळीं मुलाला घेऊन जावें असा विचार केला. पण त्याला लाज वाटली. त्याला उचलून न्यावे लागत असे. स्वतःची ही दीन स्थिती लोकांनीं पाहूं नये असें त्याला वाटलें असावें. मी खूप आग्रह केला पण त्यानें ऐकलें नाहीं. शेवटीं मी एकटीच समाधिमंदिरांत गेले.

असा क्रम तीन दिवस चालला. मीं एकटीच बाबांच्या समाधीपुढें अहोरात्र प्रार्थना करूं लागलें. मन सारखे भरून येत असे. मी असें कोणतें पाप केलें कीं अशी कठोर शिक्षा तुम्हीं मला केलीत असें मी बाबांना म्हणे. तिसऱ्या दिवशीं गावीं परतणार म्हणून मी अनन्य भावानें

बाबांना आळविलें. डोळे अश्रुंनीं डबडबले. उपासना संपताच मी पुन्हां एकदां नमस्कार करून परत वळले. पण काय आश्चर्य ! माझा पांगळ मुलगा गर्दीत एका खांबाला उभा असलेला मला दिसला. मी त्याच्याकडे धावलें. तुला इथें कुणी आणलें असें विचारतांच त्यानें जो आपला अनुभव सांगितला तो ऐकून तर मी अगदीं गहिंवरून गेलें. आम्हीं दोघांनीं परत बाबांना नमस्कार केला व मुक्कामावर आलों. माझा मुलगा खोलींत बसला असतां एकाएकी त्याला कुणी तरी बोलावित आहे असा भास झाला. त्यानें वरून पाहिलें तों साक्षात् बाबाच त्याला मंदिरांत चलण्याविषयीं सांगत आहेत असें त्याला दिसलें. 'आपल्याला चालता येत नाहीं, कसें येवूं' असें त्यानें उत्तर दिल्यावर बाबांनीच त्याच्या हाताला धरून त्याला मंदिरांत आणून पोहोंचविलें. ही त्याची हकीकत ऐकून, यावर विश्वास ठेवावा की न ठेवावा याचा माझ्या मनाला निर्णयच लागेना. आम्ही त्यानंतर घरीं परतलों. एक महिन्यानंतर हळूंहळूं माझा मुलगा त्या दुखण्यांतून पूर्ण बरा झाला. मग मात्र माझ्या अविश्वासूं वृत्तीबद्दल मला पश्चात्ताप झाला आणि श्री बाबांच्यावर माझी दृढ श्रद्धा बसली.

●

## पूर्व ऋणानुबंधाच्या या गोष्टी

मला शिरडीला जाण्याची इच्छा होती. पण माझी आर्थिक परीस्थिती बरी नव्हती. शेवटीं मेटाकुटीनें पैसे जमवून एकदांचा त्या रात्रीं बोरीबंदरवर गाडींत बसलो. पण गर्दींत माझा खिसा कापला गेला. मी हताशपणें बसून राहिलों. गाडी सुरूं होताच चेकर डब्यांत आला आणि त्यानें तिकीटाची मागणी केली. मी खिसा कापल्याचें सांगितलें. इतर प्रवाशांनी देखील दुजोरा दिला. पण चेकर कडकपणें बोलूं लागला. माझ्या समोरच एक वृद्ध गृहस्थ आपल्या पत्नी व मुलीसमवेत बसले होते. त्यांना वाईट वाटलें. ते म्हणाले, माझ्याकडे चार तिकिटें आहेत. आम्ही तिघे आहोत, चौथें तिकीट ह्या गृहस्थाचें समजा ! असें सांगून त्यानें तिकीटें दाखविली आणि म्हणाले, माझा मुलगा मागून येणार होता, पण तो येवूं शकला नाहीं ! या सर्व प्रकाराचे मला फारच आश्चर्य वाटलें. आणि त्या वृद्धांविषयींच्या कृतज्ञतेनें माझें अंतःकरण भरून आलें. पुढें परिचय झाल्यावर कळलें कीं ते शिरडीलाच जात आहेत. हें ऐकून तर बाबांच्या या लीलेबद्दल माझें मन अपार भरून गेलें. या थोर उपकाराची फेड करावी या उद्देशानें मी त्या वृद्ध गृहस्थांची प्रवासांत सेवा करण्याचा प्रयत्न केला. शिरडीला गेल्यावर मी त्या मंडळीची योग्य व्यवस्था व्हावी व त्रास पडूं नये म्हणून खूप झटलों. ते वृद्ध गृहस्थ मात्र तसें न करण्याविषयीं वारंवार आवर्जून मला सांगत असत.

ते थोर गृहस्थ म्हणजे स्थितप्रज्ञतेची:जणूं मूर्तीच होती. जातांना त्यानीं माझे परतीचे तिकिट काढलें आणि दासगणूंची सगुणोपासना मला भेटीदाखल दिली. मनमाडला आम्ही एकमेकांचा निरोप घेतला. मी मुंबईच्या गाडींत बसल्यावर सहज म्हणून ती पोथी उघडली. त्या पोथींत एक पाकीट होतें. पाकीट उघडून पाहतो तों त्यांत दहाच्या दहा नोटा

असलेल्या मला आढळून आल्या. मी या अद्‌भुत प्रकारानें थक्क झालो. त्या गृहस्थांचा मी पत्ता काढण्याचा खूप प्रयत्न केला. त्यांनीं मला दिलेल्या पत्त्यावर चौकशी केली पण तो पत्ता खोटा होता. कोण ते वृद्ध असावेत याची मनाला लागलेली चुटपुट अजूनहि संपलेली नाहीं. या जगांत अशीं माणसें असूं शकतात कां ? तुम्हींच उत्तर द्या !

घरीं येतांच तें पाकीट पैशासहित मीं देवघरांत ठेवून दिलें आहे. बाबांची पूजा करतांना श्रद्धेच्या चार अक्षता त्या पाकीटावर टाकायला मी चुकत नाहीं. कितीहि बिकट परीस्थिती येवो त्या पुण्यमय पैशाला हात लावायचा नाहीं असा मी निश्चय केला आहे. कारण तो बाबांचा मला अकस्मात मिळालेला आशिर्वाद आहे !

●

## अंतरींची ओढ !

मी मुंबईतील एका चित्रपट स्टुडीयोचा मालक आहे. या चित्रपट धंद्यांत शिरण्यापूर्वी अनेक प्रकारचा अमोल उपदेश करून एका सद्‌गृहस्थानें मला उपकृत करून ठेविलें होते. या घटनेपर्यंत म्हणजे जवळ जवळ वीस वर्षेपर्यंत हा गृहस्थ मला भेटूं शकला नाहीं किंवा मलाहि माझ्या धंद्याच्या व्यापामुळें त्याला भेटतां आलें नाहीं. माझी श्री साईबाबांवर श्रद्धा आहे. त्यांच्या प्रार्थनेनें मला अनेक अडचणींतून मुक्त केले आहे. त्यामुळें एकदां शिरडीला जावून बाबांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करावी असें मधून मधून सारखे वाटूं लागलें होते. पण खूप तयारी करूनहि ऐनवेळीं एखादी विलक्षण अडचण येत असे व जाणे रहित करावे लागत असे. परंतु एके दिवशीं आर. सी. ए. कंपनीचे एक व्यवस्थापक आपली मोटार माझ्याकडे घेवून आले आणि शिरडीला चला असा आग्रह करूं लागले. मी देखील जणूं अंतःप्रेरणेनें लागलीचं तयारी करून त्यांच्या मोटारींत बसलो. साऱ्या प्रवासांत श्री बाबा अथवा शिरडी याविषयींचे विचार माझ्या मनांत येण्याऐवजीं त्या जुन्या उपकारकर्त्याची मूर्तीच माझ्या डोळ्यापुढें सारखी येऊं लागली. असें काय होत आहे तेंच मला समजेना. संध्याकाळीं शिरडीला पोहोंचलो. लागलीच आम्हीं दर्शनासाठीं मंदिरांत गेलो. आणि काय आश्चर्य ! माझा तो उपकारकर्ता मंदिरांतच एका बाजूला उभा असलेला मला आढळून आला. मी धांवत जाऊन त्याला कडकडून भेटलो. माझी मनोकामना जाणूनच कीं काय बाबांनीं हा सर्व प्रकार घडवून तर आणला नसेल ना असें वाटून बाबांच्यापुढें मी लोटांगण घातलें.

---

## वाचकांसाठीं आणि विक्रेत्यांसाठीं—

**पुढचा अंक आक्टोबर १ तारखेस 'खास दसरा-निर्वाण अंक' म्हणून प्रसिद्ध होईल, त्यानंतर १ जानेवारीस 'नवविधा-भक्ति' अंक, पुढें १ एप्रिलला 'श्री रामनवमी-अंक' आणि पुन्हां १ जुलैस 'गुरुपूर्णिमा-अंक' अशा कालक्रमानें साईलीलेचे अंक प्रसिद्ध होतील.**

# जाहीर खबर

ट्रेडमार्क कायद्याच्या आठव्या कलमान्वयें इतःपर कोणाहि व्यवसायिकास आणि धंदेवाइकास 'श्री साईबाबा' 'श्रीसाई' वगैरे नांवें आपल्या मालाला, वस्तूला अथवा व्यावसायिक धंद्याला अथवा संस्थेला देणें अथवा लावणें हें, साईभक्तांच्या पूज्य भावनेला बाधक असल्यानें, निषेधार्ह व बेकायदेशीर समजलें जाईल. त्याच प्रमाणें आपल्या धंद्यासाठीं श्रीसाईबाबांच्या फोटोचा, रेखाचित्राचा अथवा प्रतिमेचा उपयोग करण्यासहि सक्त मनाई करण्यांत येत आहे. ह्या निर्बंध मोडणाऱ्यावर कायदेशीर इलाज करण्यांत येईल, कळावें.

—शिरडी संस्थान व्यवस्थापक.

No. 5 (7)-TM & P (TM) /55

## GOVERNMENT OF INDIA

**Ministry of Commerce and Industry.**

New Delhi, the 21 st September 1955.

From,

Shri. **T. S. Ramaswami,**

Under Secretary to the Government of India.

To,

**The Managing Trustee,**

Shri Sai Baba Sansthan, Shirdi.

25, Bank Street, Fort, BOMBAY 1.

Subject : Request for the issue of direction under section 16 (1) of the Trade Marks Act, 1940 prohibiting the registration of a trade mark consisting of or containing the portrait of "Shree Sai Baba" or the words "Shree Sai Baba" etc.

Sir,

With reference to the correspondence resting with this Ministry your letter of even number dated the 24th June 1955, on the above subject, I am directed to say that the Central Government have issued the necessary direction under section 16 (1) of the Trade Marks Act, 1940, to the Registrar of Trade Marks, Bombay, in the matter.

I am to add that in the case of Trade Marks already registered, consisting of or containing the words " Shree Sai Baba " or the device of " Shree Sai Baba " the Shree Sai Baba Sansthan may if they so desire, approach the Registrar of Trade Marks for rectification of the Register, in accordance with the provisions of section 46 (1) of the Trade Marks Act.

*Yours Faithfully,*

True Copy. **Sd/ T. S. Ramaswami,**

Under Secretary to the Government of India.

"आत्मनिरीक्षण केल्यास तुम्हांस कळून येईल कीं, सर्व विश्वांत जें व्यापून राहिलें आहे त्या 'पूर्णा'चें तुम्ही अंश आहांत; त्या अर्थानें खरोखर तुम्ही सच्चिदानंद आहात!" अशी जो सदा सर्वदा तुम्हाला जाणीव देतो—

# तोच खरा सद्गुरु!

लेखक : **श्री. बाळासाहेब रेगे**

श्रीगुरुदेव सिद्ध आहेत, ते सच्चिदानंद आहेत. त्यांचें शरीर पंच तत्त्वांत एकरूप झालें आहे. तथापि ते चराचरांत अमर आहेत चमत्कारानें आकर्षित न होतां निस्सीम भक्तीनें त्यांना अनन्य शरण गेलें पाहिजे. केवळ चमत्कारांनांच भुललों तर आपणांस त्यांचें श्रेष्ठत्व कळलें नाहीं असें मानावें. एकादा जादुगार नाना तऱ्हेचे पोटासाठीं चमत्कार करूं शकतो, त्याच्याशीं सद्गुरूंची तुलना करणें हें अव्यवहार्य होईल. मी आपणां सर्वांस अशी विनंति करतो कीं, निर्मळ भावभक्ति ठेवून आत्मोद्धार कसा होईल ह्याकडे लक्ष पुरवावें. श्रीगुरुमाउली स्वार्थासाठीं चमत्कार करीत नसून ती केवळ त्यांची लीलाच असते. ते स्वतः निरिच्छ असून कोणतीही अपेक्षा न ठेवतां केवळ भक्तांच्या उद्धारासाठीं अहोरात्र खपत असतात. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति। देह कष्टविती परोपकारें ॥' स्वतःचें ज्ञान अपुरें असल्या-मुळें सद्गुरूंच्या कृपेंखेरीज गत्यंतर नाहीं. सिद्ध कोण आहे हें आपणांस सांगता येणार नाहीं. तें केवळ अनुभवानेंच कळूं शकतें. तें शाब्दिक ज्ञानाच्या पलीकडचें आहे. 'नेति नेति'! विवेकानंद, श्रीरामकृष्ण परम-हंस यांस शरण जाऊन प्रश्न करते झाले कीं, आपणाला परमेश्वराचें दर्शन झालें आहे काय व तें परमेश्वरदर्शन मला घडवूं शकाल काय?' परमहंसानीं होकारार्थी उत्तर दिलें व म्हणालें कीं, 'एक अट आहे. प्रथम आत्मनिरीक्षण करून स्वतः आपण कोण आहों हें तूं ओळखलें पाहिजे. व त्याकरितां ध्यानधारण वगैरेंचा अभ्यास केला पाहिजे.'

'चिंतन चित्ताला लावी मनाचे मनाला—'

'उन्मनीच्या सुखाआंत पाडुरंग भेटी देता'

ही स्थिति प्राप्त होण्यास सद्गुरूच निःसंशय कारणीभूत असतात. 'सद्गुरूला शरण रिघा, कांस धरा, विश्वासें तयाचा देणार नाहीं दगा। एकदां एक मुमुक्षू सिद्धाकडे गेला आणि त्यानें कृपेची याचना केली. सिद्धानें त्यांस दुसरे दिवशीं येण्यास सांगून, आपण आलां कीं, मजला सूचना द्या अशी आज्ञा केली. दुसरे दिवशीं तो साधक महर्षींकडे गेला व आपण आल्याचें एका चिठ्ठीवर नांव

लिहून कळविलें. सिद्धानें त्यास जवळ बसवून विचारलें कीं, 'तुम्ही कोण आहांत?' साधकानें आपलें नांव सांगितलें. सिद्धानें विचारलें, 'हें नांव केव्हां धारण केलें?' साधक म्हणाला, 'बारावें दिवशीं नामकरणविधी झाला तेच वेळीं.' 'त्यापूर्वीं तुम्हांला कसें ओळखत असत?' 'तेव्हां निनामी बालक होतो.' नंतर सिद्धानें 'मातेच्या उदरांत गर्भावस्थेंत होतां हें पटविल्यानंतर त्याचेपूर्वीं कोठें होतां?' हा प्रश्न केला. तेव्हां साधक निरुत्तर झाला. सिद्ध म्हणाले, 'म्हणजे तुम्ही नाम धारण केलेलें शरीर नाहीं, अथवा दिसणारा आकारही नाहीं. आत्मनिरीक्षण केल्यास तुम्हांस कळून येईल कीं, सर्व विश्वांत जें व्यापलें आहे त्या पूर्णाचे तुम्ही अंश आहांत, तुम्ही सच्चिदानंद आहांत.' ही जाणीव जो देतो तोच खरा सद्‌गुरु. उपनिषदें आपणांस हाच मार्ग दर्शवितात. मांडुक्योपनिषदांत एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, तुम्ही कोण आहांत? जाग्रत अवस्थेंतील चालते-बोलते व सर्व व्यवहार करणारे आहांत, कीं तदनंतर विश्रांतीकरितां आंथरुणावर पडलेले व झोंप लागण्यापूर्वी स्वप्नस्थिति वगैरे अनुभव घेऊन नंतर घोर निद्रेंत जाऊन व सुषुप्ति अनुभविणारे आहांत? या तिन्ही अवस्थांचें ज्ञान विचारवान् मनुष्यांस कळूं शकतें; परंतु चवथी अवस्था जी तुर्या ज्यांत जीव आणि शिव एकरूप होतो ती अवस्था प्राप्त होण्यास सद्‌गुरूंची कृपाच आवश्यक असते. श्रीकृष्णानीं सांगितलें आहे कीं, या तीन अवस्थांचें जन्मोजन्मीं अनुभव मुमुक्षू घेतात; परंतु यापुढील तुर्यावस्था मात्र एखाद्यासच प्राप्त होऊन तोच एक मजला पूर्णपणें जाणूं शकतो. 'मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये। यततामपि सिद्धानां कश्चित् माम् वेत्ति तत्त्वतः॥'

व्यवहारांत व प्रपंचांत आपण बुद्धीच्या व ज्ञानाच्या जोरावर यश प्राप्त करूं शकतों; परंतु आत्मानुभव घेण्यास अपात्र असतों, आणि त्याकरितां सद्‌गुरूची कृपाच आवश्यक असते. त्यांचे कृपेनें परमेश्वराच्या विशाल रूपाचें ज्ञान होऊं शकतें. एकदां श्रीरामाने हनुमंतास प्रश्न केला कीं, तुम्ही कोण आहांत, त्यावेळेस मारुतीराय म्हणाले, "देह बुद्ध्यातु दासोहं जीव बुद्ध्या त्वदंशकः, आत्मबुद्ध्या त्वमेवाहं इति मे निश्चलामतीः।" 'ज्या वेळीं मी देहापुरताच विचार करतों तेव्हां मी आपला म्हणजे रामाचा दास आहे, असें समजतों, आणि केवळ सेवा हाच माझा धर्म आहे असें मानतों. परंतु मी आत्मविचार करतों, तेव्हां मजला वाटतें कीं, मी आपलाच एक अंश असून तुम्ही जरी विभक्त दिसत असलां तरी तुम्ही व मी भिन्न नसून तुमचें व माझें स्वरूप एकच आहे. कारण तुमची शक्ती चराचरांत भरली आहे.' सेवा, नवविधाभक्तीपैकीं एक मार्ग आहे. इतर मार्गेही साधक आपआपले कर्मानुसार अभ्यासितात. भक्ती व ज्ञान यांत भिन्नता भासते; परंतु साधकांस अनुभवानें सत्यस्वरूप कळून येतें. ज्ञान व भक्ति तत्वतः एकच आहेत. आपण एखादें उदाहरण पडताळून पाहूं:—श्रीरमणमहर्षि मोठे ज्ञानी संत होते. त्यांना आपले ज्ञानाचा अभिमान होता कां? नाहीं. ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर त्यांची खात्री झाली कीं, सच्चिदानंद अवस्था भक्तीनेंच मिळूं शकते. आद्य शंकराचार्य, यांचाही हाच अनुभव आहे. ते महाज्ञानी म्हणून सुप्रसिद्ध होते. त्यांनीं आपला स्वानुभावाचा चिदानंदरूप शिवो ऽहं शिवो ऽहम्। या शब्दांत वर्णिलें आहे. म्हणजे 'शिव व मी भिन्न नसून एकाच चित् शक्तीचें विभक्त रूप आहोंत. मी स्वतः शिव आहे.' त्यांचे भक्तीसंबंधीं विचार

मननीय आहेत. अपराध–क्षमपणा स्तोत्र मधुर आहे. पृथिव्यां पुत्रास्ते जननि-बहवः सन्ति सरला, परम् तेषांमध्ये विरलतरलोहं तव सुतः, मदियोयं त्यागः समुचितमिदन्नोतव शिवे, कुपुत्रो जायेतः क्वचिदपि कुमाता न भवति।' म्हणजे, 'हे माते, तुला जगांत अनेक सद्गुणी सुपुत्र आहेत; परंतु मीच एक अज्ञानी व मूर्ख पुत्र आहे. हे पार्वती, तूं माझा अव्हेर करावा हें बरें नाहीं. चांगल्या मुलांत खट्याळ जो असतो त्याचें प्रति-पालन माताच करते. मातृप्रेम निस्वार्थी असतें.' हिंदु धर्मात स्त्रियांचें फार मोठें स्थान आहे. त्यामुळें धर्म जागृत आहे. जेव्हां तुम्ही मोक्ष मिळविण्याच्या भावनेनें सिद्धाकडे शरण जातां, तेव्हां सेवा कशी करावी हें श्रीमद्भगवद्-गीतेंत श्रीकृष्णानें अर्जुनास सांगितलें आहे. 'तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।' श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'जयाचेनि कृपा सलिलें, जीव हा ठाववरी पाखाळे, जयीं शिवपणही ओविलें, अंगीं न लगे॥' ज्ञानेश्वर-महाराज हे एक मूर्तिमंत गुरुभक्त होते. गुरुदेव निवृत्तिनाथ यांचे ठिकाणीं त्यांची अढळ श्रद्धा होती. मुमुक्षूनें आपले गुरुमाउलीशीं त्याचप्रमाणें वागलें पाहिजे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं सद्गुरुंचा महिमा फार अमृततुल्य शब्दांत वर्णिला आहे. 'ज्ञानाग्निः सर्व कर्माणि भस्मसात् कुरुते तथा।' जाळिलें संचित समुळी ज्ञानाग्निमाजीं निगुती, क्रियमाण पूर्वसंचिती विधिपूर्वक कर्मे घडती। सद्गुरूंचे कृपेनें पूर्वसंचिताचा खंड होऊन केवळ आत्मा हाच साक्षीभूत राहून निरहंकार वृत्तीनें आपआपलीं प्राप्त कर्मे ते करीत असतात. हा अनुभव प्राप्त होण्यास साधकाचें सद्-गुरूशीं तादात्म्य व्हावें लागतें. बाबांचेकडे जाणाऱ्या भक्तांत क्वचितच एखादा या सदिच्छेनें त्यांना शरण गेला असेल. बहुतेकजण केवळ सांसारिक अडचणींतून मुक्त होण्याकरितां कामिक भावनेनें त्यांचे-कडे जात असतात. खरोखर भक्त पवित्र भावनेनें शरण गेला तर त्याचा आत्मोद्धार होण्यास क्षणभरही वेळ लागणार नाहीं.

---


॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

**बॉम्बे सिल्व्हर शॉप**

टेलिफोन ३८८६२

शुद्ध चांदीचा हरेक तऱ्हेचा माल बनविण्याचें व ऑर्डरप्रमाणें माल करून देण्याचें विश्वासलायक ठिकाण. त्याचप्रमाणें सोन्याचाही माल ऑर्डर-प्रमाणें करून देण्यांत येतो. एकदां भेट देण्याची तसदी घेऊन खात्री करून घेण्याची विनंती आहे.

**बा. गो. जुवेकर**

मालक

गिरगांव, मांगलवाडी,
श्री धूतपापेश्वर प्रासाद, मुंबई नं. ४

॥ विमलेश्वर प्रसन्न ॥

**भा. रा. रेवणकर सराफ**

ठळकवाडी (बेळगांव)

**सोन्या-चांदीच्या तयार दागिन्यांचे व्यापारी**

आमचेकडे खडे मोत्यांचे सेटिंग्जचे आधुनिक पद्धतीचे दागिने, लफ्फे, तन्मणी, नेकलेस इअरींग्ज वगैरे तयार होतात.

बाहेरगांवच्या व्यापाऱ्यांचे ऑर्डरी-कडे विशेष लक्ष दिलें जातें.

सामान्य लोकांच्या आचारविचारांत क्रांति घडविणारें

# संत तुकोबांचें जलदिव्य !

तुकोबांच्या छळाचे अगदीं थोडेच प्रसंग आज सांगण्यांत येतात. पहिला वह्या बुडविण्याचा. दुसरा, शिवजी कासाराच्या बायकोनें त्यांच्या अंगावर उकळतें पाणी ओतल्याचा व तिसरा मंबाजी गोसाव्यानें मारल्याचा. यापैकीं पहिला प्रसंग जितका महत्त्वाचा तितकाच तो सर्वव्यापी आहे. तुकोबा जें लिहीत तें भिक्षुक ब्राह्मणांना मान्य नव्हतें. त्यांत दुमत नाहीं. वादाची एक बाजू म्हणते कीं, तुकोबा यातीहीन क्षुद्रवंशीय असल्यानें त्यांना वेदार्थाचें सार, अर्थ किंवा शास्त्र सांगण्याचा अधिकार नाहीं. तेव्हां धर्मरक्षणासाठीं तुकोबांचा बंदोबस्त होणें आवश्यक आहे. दुसऱ्या बाजूचें म्हणणें कीं मी फक्त भारवाही असून गुह्य अर्थभेद जाणण्याची माझ्यांत पात्रता नाहीं. तेव्हां जें लिहिलें तें 'देवाच्या आज्ञेनें लिहवलें तसे लिहिलें.'

आतां तुकोबांचा म्हणून मानल्या जाणाऱ्या लेखनांतील कोणता भाग वादांचें कारण होऊं शकतो हें पहावयाचें आहे. तुकोबांच्या गाथेंत त्यांच्या कवित्वाबद्दल बरेंच उल्लेख आहेत. तुकोबा सांगतात, 'नव्हती माझे बोल। जाणा हा निर्धार। मी आहे मजूर। विठोबाचा॥ तुका म्हणे बोल। माझा बोल तो विठ्ठल॥ करा क्षमा कांहीं। धरूं नका कोप। संत मायबाप। दीनांवरी॥ करितो कवित्व। म्हणाल हें कोणी। नव्हे माझी वाणी। पदरींची॥ काय मी पामरें। जाणे अर्थभेद। करवी गोविंद। तोचि वदे॥

वरील उक्तीवरून एक गोष्ट स्पष्ट होते. ज्या लेखनाबद्दल वाद सांगावा लागला, तें लेखन तुकाराम या व्यक्तीचें नसून भगवंताचे ते उत्स्फूर्त बोल होते. असें जरी असलें तरी आपल्या ज्ञानाबद्दलचा आत्मविश्वास तुकोबांना कांहीं कमी नव्हता, हें विसरून चालणार नाहीं. ते म्हणतात— वेदांचा तो अर्थ। आम्हांसीच ठावा। येरांनी वहावा। भार माथा॥ तुका म्हणे दास। आहे मुळींचाच खरा। —तुकोबा आपल्या गीतानुवादांत म्हणतात—तुका वदे विचरुनी। मांदुरा गीतारत्नखाणी। ऐसे हें पूर्वीचें आहे भांडवल। सांपडे नवल तुकयासी।—गीतेच्या अर्थ लावण्याचें द्वैत, अद्वैत, केवलाद्वैत, शुद्धाद्वैत, विशिष्टाद्वैत वगैरे संप्रदाय आहेत. त्यांतील भक्तीलाचा प्रामाण्य देणारा विशिष्टाद्वैत संप्रदाय जुनाच आहे. त्यांत तुकोबा नवीन संप्रदाय पाडतात असा प्रकार नाहीं. सारांश, तुकोबांचा या वादांतील पुरावा, गीतानुवादाला उद्देशून होता हें स्पष्ट होतें. सतराव्या शतकाचें सुरवातीस निरनिराळ्या जातींच्या धर्माधिकाराचे तंटे बरेच चालू होते. ब्राह्मण, भिक्षुक व गोळक, जावळे, सोनार, सारस्वत, प्रभू इत्यादींना सोळा संस्कारांचे अधिकार नाहींत वगैरे भांडणें चालूच होतीं. वेदांचा उच्चार करण्यास, शूद्रांना हक्क नाहीं हाच सिद्धांत या भांडणाचा मूळ पाया होता.

यामुळें कांहीं ठिकाणीं संस्कृत ग्रंथ व ही गीर्वाण भाषा बोलणाऱ्या वा वाचणाऱ्या

गो-ब्राह्मणांचा निषेध होत होता. गीता हा पुरातन ग्रंथ असतांना सुद्धां त्यावर बहिष्कार टाकण्याचा कडक प्रयत्न होत होता. गीता ग्रंथ भिक्षुकांचा वैरी होऊं लागला होता. वेदान्तीं भिक्षुक कुळांतील बहिणाबाई म्हणते, नामाचा विटाळ, आमुचीये घरीं। गीता शास्त्र वैरी। कुळीं आम्हां ॥

गीता ग्रंथाबद्दल जितुका भिक्षुक वर्गाकडून असा निषेध होत होता तितकाच तो ग्रंथ खालच्या थरांतील जनतेंत अधिकाधिक प्रसार पावत होता. तुकाराम वाणी किंवा शूद्र असल्यामुळें त्याला तत्कालीन धर्मशास्त्राचे समजूतीप्रमाणें गीतेसारख्या संस्कृत भाषेतील ग्रंथावर टीका करण्याचा अधिकार नव्हता. तुकोबांनी गीतेचा सोप्या आणि सुबोध भाषेंत अनुवाद करून, सर्व थरांतील जनतेच्या स्त्री-पुरुषास भक्तीचा नी अध्यात्मज्ञानाचा श्रेष्ठ मार्ग मोकळा करून दिला, हें निश्चित. त्यांच्या गितानुवादाच्या प्रती बऱ्याच संतांनीं रोजच्या श्रवणपठणार्थ करून घेतल्या असाव्यात. त्यामुळें या ग्रंथाचा बराच बोभाटा झाला आणि म्हणून आपल्या भिक्षुकीवृत्तीवर अतएव धर्मावर गदा आणणाऱ्या या ग्रंथाविरुद्ध ग्रामण्य उठवण्यास वैदिक ब्राह्मणांनीं सुरवात केली. ते दिवाणांत गेलें. प्रघात किंवा रूढी हाच पारमार्थिक धर्म असें मानणाऱ्या सामान्य जनालाहि दिवाणातील निर्णय मान्य होण्यासारखें होतें.

या दिवाणांत तुकोबांच्या अंगावर बाजू आली असली पाहिजे. तुकोबा म्हणतात—आतां येणे चवी सोडिली म्हणती। निवाडा करीती दिवाणांत ॥ भल्या लोकांपाशीं सांगितली मात। केला माझा घात दुर्बळाचा ॥ तुकोबांची सर्व मदार देवांनीं त्यांचे हातून लिहविलें या पुराव्यावर राहिल्यानें साक्षिदारांचें अभावीं दिव्यांचा संदेश देणें आतां त्यांना प्राप्त होतें. दिव्य घेतल्यानंतर ठराविक कालपर्यंत दैवी आपत्ती येतात कां कसें ? हें फार बारकाईनें पाहून नंतर धर्मशास्त्राप्रमाणें दिव्यांचा निर्णय जाहीर करावयाचा असतो.

तुकोबांच्या वह्या नेहमींच्या सोप्या मार्गानें अग्निनारायणाच्या स्वाधीन करणें सहज साध्य होतें. जल-दिव्यापर्यंत पाळी आली नसती तर अन्य मार्गानेंहि त्यांचा विध्वंस करतां आला असता. परंतु वैश्यवर्णाला शास्त्रानें जलदिव्यच सांगितलें असल्यानें अन्य उपाय अगर दिव्य देणें शक्य नव्हतें.

इंद्रायणीच्या डोहांत वह्या बुडवल्याच्या प्रसंगाची कालमर्यादा अठरा दिवसांची सांगतात. शास्त्राधारें तीन दिवस उपोषण, चौथ्या दिवशीं दिव्य देण्याचा विधि व नंतर दैवी परीक्षणाचे दिवस. तुकोबांनीं आपल्या वह्या आपणच जलांत बुडविल्या हेंहि शास्त्राप्रमाणेंच झालें.

तुकोबा १३ व्या दिवसांनंतर म्हणतात, तेरा दिवस झाले निश्चक्र करितां। न पावसी अनंता मायबापा ॥ पाषाणाची खोळ घेउनि बैसलासी। काय हृषिकेशी झालें तुज ॥ तुका म्हणे मांडिले निर्वाण। प्राण हा सांडिन तुजवरी ॥

परंतु चौदाव्या दिवशीं वह्या तरल्या. अन्तीं तुकोबांना त्या जलदिव्यांत यश आले. उदकीं राखिले कागद। चुकविला जनवाद। तुका म्हणे ब्रीद। साच केलें आपुलें ॥

या जल दिव्यामुळें तुकोबांना नकोसा असतांना सुद्धा त्यांचा आपोआपच ‘झाला हा डांगोरा। मुखीं लहानांहि थोरा ॥’ एकंदरींत या दिव्यानें तुकोबांच्या गीता तत्त्वज्ञानाला व गीतानुवादांतील भक्ति-

महात्म्याला निराळ्या पंथाची स्थापना न करावी लागतां जनतेची आणि संतांची पूर्ण मान्यता मिळाली. आचारधर्म, व्रतवैकल्यें हीं परमार्थ साधनास अनुपयुक्त, योगादि साधनांतील मार्गदर्शनामुळें परमार्थाचा रस्ता दुर्घट व दुस्तर, साधन मार्गांतली पारतंत्र्यामुळें तो मार्ग आक्रमिणें कठीण, संन्यास वैराग्याची शक्याशक्यता, अंधभक्तींत असणारा ज्ञानाचा अभाव आणि भक्तिमार्गाचें महत्त्व आणि भक्तिमार्गाचे सुलभत्व व महत्त्व वगैरे गोष्टी पटवून सामान्य लोकांच्या आचारविचारांत क्रांति घडविणारा सतराव्या शतकांतला महान् संत आणि द्रष्टा म्हणून संत तुकारामाचें नांव भारताच्या अध्यात्मिक इतिहासांत अमर राहील यांत मुळींच संशय नाहीं !

एका परमेश्वराशिवाय इतर देवता पितृगण वगैरेंचें पूजन-अर्चन करणें क्षुल्लक मानून त्यांचा पराभक्तीशीं संबंध नाहीं हें तुकोबांनीं प्रस्थापित केलें. गुरूपदेशाची अव्यवहार्यता व फुकट व्याप्ती आपल्या उदाहरणानें दाखवून गुरुशिष्यांचीं रूढी मोडली. 'राम—कृष्ण—हरि' या तिहींचा एका विठ्ठलांतच समावेश होतो असें सांगून तत्कालीन पंथांच्या रूढ मर्यादेंतून स्वतंत्र मार्ग काढला. पारमार्थिक जगतांत धर्मभेद, जातिभेद, वर्णभेद व सामान्य व्यवहारांतील व्यक्तिभेदांचें अस्तित्व असत्य असल्याचे प्रतिपादून सर्वांना निदान भक्तीच्या आवारांत तरी एकच दर्जा व सर्वाधिकार त्यांनीं मिळवून दिला. त्यामुळें सामुदायिक उपासना सुलभ व एकमार्गी झाली. ही सर्व क्रांतिकारक तत्त्वें रूढ करण्यासाठींच गीताशास्त्राचा आधार घेऊन त्यावरच तुकोबांनीं आपला क्रांतिवाद अधिष्ठित केला असें शेवटीं म्हटलें पाहिजे.

---

**श्री दासगूण महाराज : व्यक्तिदर्शन व वाङ्मयदर्शन**—प्रा. डॉ. अनंतराव आठवले यांनीं लिहिलेल्या वरील सद्‌ग्रंथाचा श्री. दत्तो वामन पोतदार यांनीं केलेला पुरस्कार या अंकांत मुद्दाम दिला आहे. ग्रंथाचें सविस्तर परीक्षण आणि रसग्रहण पुढील अंकांत आम्हीं देत आहों.

**कर्तव्य**—संपादक, मधुकर जोशी, कर्तव्य कार्यालय, १३९ कसबा पेठ, पुणे २.

अध्यात्मिक आणि नैतिक विचारांना वाहिलेल्या या नव्या मासिकाचें आम्हीं स्वागत करतो. एक सुसंपादित आदर्श मासिक म्हणून या मासिकाकडे बोट दाखवावें असें वाटतें.



● पंचांगांत लिहिलें आहे वीस इंच पाऊस पडेल म्हणून. पण तेंच पंचांग पिळल्यास एक थेंबभर देखील पाणी टपकणार नाहीं. पोथींत अनेक धर्मकथा लिहिलेल्या असतात. पण नुसती पोथी वाचून का धर्मलाभ होणार आहे ? साधना करायला हवी.

# तें अमृत आतां कोठें मिळेल ?

> द्यावें तसें घ्यावें हा तर सुखाचा मूलमंत्र आहे; किंबहुना दुसऱ्याला दिल्याशिवाय घेतां येत नाहीं अशी एकच गोष्ट या जगांत आहे—ती म्हणजे सुख !

लेखक—प्रा. हे. वि. इनामदार, एम्. ए.

तुम्हाला रवीन्द्रनाथ ठाकूर यांची ती गोष्ट माहीत आहे का ?

—विजयादशमीची मिरवणूक निघाली होती. भालदार, मानकरी, सरदार व असंख्य जनसमूह यांच्या समवेत राजाधिराजांची स्वारी मिरवत चालली होती; याचकांच्या अंगावर धन उधळीत होती. सर्वजण राजाला दुवा देत होते; त्याच्या नांवाचा जयजयकार करीत होते.

या सर्व मनोहर दृश्यापासून थोडें दूर, रस्त्याच्या कडेला एक भिकारी उभा असलेला राजानें पाहिला. 'सुंभाचा करगोटा, रकट्याची लंगोटी' अशी संत नामदेवांप्रमाणें त्याची स्थिति होती. हातांत जीर्ण, मलीन झोळी व डोळ्यांत दैन्य ! या सर्व धुमाळींत आपली वर्णी लागणें कठीण या कल्पनेनें तो दूर उभा असावा असें राजाला वाटलें.

राजानें झटकन् माहुताला खूण केली. तो खालीं उतरला व त्या भिकाऱ्याजवळ नेला. भिकाऱ्याला आश्चर्य वाटलें, आनंद झाला. राजा आतां आपल्याला निदान एखादी सुवर्ण–मुद्रिका दान करील या अपेक्षेनें, आतुरतेनें त्यानें आपली झोळी पुढें केली. पण झालें भलतेंच ! राजानेंच त्याच्या पुढें आपला हात पसरला. एका राजेश्वरानें यःकश्चित् भिकाऱ्याजवळ याचना करावी ?—केवढा विलक्षण प्रसंग ! भिकारी स्तंभित झाला, निराश झाला, चरफडला. त्यानें मोठ्या मिनतवारीनें झोळींतले दोन दाणे राजाच्या हातावर ठेवले. राजानें प्रसन्न मनानें स्वीकारले व पुन्हा अंबारींत बसून तो निघून गेला. भिकाऱ्यानें खोपटांत आल्यावर झोळी पालथी केली, तों काय आश्चर्य ! ज्वारीच्या त्या छोट्या ढिगांत दोन सुवर्णकण चमकत होते. मोगऱ्याच्या पुष्पराशींत सोनचाफ्याचीं दोन फुलें कुणी टाकावींत तसे ! त्यानें राजाला दिलेल्या दाण्यांएवढेच कण होते ते. लहान नाहींत व मोठेहि नाहींत. अगदीं तेवढेंच ! धान्याच्या त्या राशीकडे पाहून तो भिकारी पश्चात्तापानें ढसढसां रडला !

—विश्वमोहिनी सुवर्ण-रथांत बसून आमच्या दाराशी आली कीं आम्हीहि तिच्यापुढें हात पसरतों; पण तिनेंच आपल्याजवळ याचना केली कीं, आपण मुलुखाचे कृपण होतों. तिला कमींत कमी काय देतां येईल याचा विचार करतों. पण द्यावें तसें घ्यावें हा तर सुखाचा मूलमंत्र आहे; किंबहुना दुसऱ्याला दिल्याशिवाय घेतां येत नाहीं, अशी एकच गोष्ट या जगांत आहे.—ती म्हणजे सुख!

आमची त्यागविन्मुखता व स्वार्थलोलुपता यांनीं आम्हीं आमचीं दुःखें व आमच्या साऱ्या समस्या निर्माण करून ठेवल्या आहेत. आज आम्ही वंचनेच्या वाळवंटीं उभे आहोंत. व्यक्तिसुखाचीं जीं कमनीय वांछितें आम्हांला भुलावण घालतात तीं कांचनमृगाप्रमाणें फसवून समाज-जीवनापासून दूरवर नेतात व शेवटीं तोंडघशी पाडतात, सपशेल फसवितात. मी, माझें कुटुंब, माझीं मुलेंबाळें, माझा बंगला एवढेंच काय तें जीवन अशी लक्ष्मण-रेषा आम्ही आमच्या भोंवतीं आंखून घेतों. चाळींतल्या भाडेकऱ्यानें गॅलरींतल्या कुंडींत अधिक धान्य पिकविण्याची मोहीम सुरू करावी तसे आम्ही आमच्या अस्मानी आकांक्षाभोवतीं रुंजी घालतों. स्वसुखाभिलाषेची परिसीमा झाली कीं मनुष्य कांचनाचा दास बनतो. कुसुमदलांच्या किनखापी कोशांत भ्रमरानें गुंतून रहावें त्याप्रमाणें अशा माणसाला कनकाच्या कैदेंतून मुक्त व्हावेंसें वाटत नाहीं. धनलाभाचा हव्यास वाढला कीं अपहरणाची प्रवृत्ति वाढते. त्यामुळें असंतोष, हेवा, द्वेष, कलह या सर्वांची वाढ होते. आज आमची अशी स्थिति झाली आहे. कालचा साधाभोळा माणूस आज यंत्र-मानव झाला आहे. उद्यां तो यंत्र-दानव होईल कीं काय अशी भीति निर्माण झाली आहे. सत्य, शिव व सुंदर यांऐवजीं रुपये, आणे व पै यांमध्यें तो जीवनाचें मूल्यमापन करूं लागला आहे. 'कशासाठीं, पोटासाठीं-खंडाळ्याच्या घाटासाठीं!' असें एक शिशुगीत आहे. आजचा यंत्र-मानव हा 'कशासाठीं? तर पोटासाठीं!' एवढेंच पालुपद गुणगुणत बसला आहे. खंडाळ्याचा घाट व तिथली हसरी हिरवी सृष्टि यांचा त्याला विसर पडला आहे. भाकरीच्या तत्त्वज्ञानानें तो भारावून गेला आहे, भांबावून गेला आहे. खाद्य, पेय, दृश्य व श्राव्य हीं सारीं त्याच्या सेवेला सादर आहेत; तरी पण तो असंतुष्ट आहे. त्याच्या सुखसोयी वाढत आहेत, पण सुख मात्र कमी होत चाललें आहे आपलें 'हरपलें श्रेय' कसे गवसेल या चिंतेंत तो चूर आहे.


**"सुखें सारीं भवतालीं**
**तरी नाहीं समाधान**
**असें कसें घडविलें**
**देवा, तुम्ही माझें मन?**
**वाटे माझें परब्रह्म**
**पैल यमुनेच्या तीरीं**
**उभें राही नादवीत**
**गूढ मधुर बांसरी!"**

—आणि या असंतोषाचें कारण अगदीं स्पष्ट आहे. आमच्या आजच्या जीवनांत विश्वास औषधापुरताहि उरला नाहीं, श्रद्धेचा मागमूसहि राहिला नाहीं. भक्तीचा ओलावा सुकला आहे. जीवन हें

त्यामुळें कोरडें, शुष्क व रसहीन बनलें आहे. लोकांना नेत्यांविषयीं आदर वाटत नाहीं, सरकारवर त्यांची भक्ति नाहीं. राजकर्त्यांना जनतेची नाडी सांपडली नाहीं. जनतेला पोट नाहीं, डोकें नाहीं व हृदयहि नाहीं, अशी मात्र त्यांची कल्पना झाल्यासारखी दिसते. विद्यार्थ्यांना अध्यापकांविषयीं आदर नाहीं, पालकांबद्दल प्रेम नाहीं, पुढाऱ्यांविषयीं प्रीति नाहीं. भाऊ–भाऊ, पिता–पुत्र, माय–लेक, पति–पत्नी, सासू-सून, बहीण–भाऊ हीं सारीं नातीं नांवा-पुरतीं राहणार अशी भीति वाटूं लागली आहे. त्यांच्यांतील उत्कटत्व कमी होऊं लागलें आहे. घर ही संस्था दिवसेंदिवस ढांसळत चालली आहे. आमचें जीवन विफल होत चाललें आहे, 'नेति, नेति' हें आजच्या जीवनाचें सारसर्वस्व बनलें आहे.

सद्यःसमाज–जीवनांत ही जी मोठी पोकळी भासत आहे तिला जबाबदार कोण ? ती भरून निघेल काय ? कशी निघेल ? कोण ती भरून काढील ? कलिकांप्रमाणें लोकांचीं मनें उमलावींत व त्यांतून समाधानाचें सौख्य–धन दरवळावें असें वाटतें; पण त्यांना अरुणाचे कुंकुमकर केव्हां स्पर्श करतील ? जीवनांतील दुःखपूर्ण घटनांमुळें विरक्त झालेल्या महात्मा बुद्धानें बोधिवृक्षाखालीं तपस्या आरंभिली. ' अमृतं प्राप्तुमितोऽत्र मे पियासा ' असें म्हणून त्यानें तपश्चर्येला सुरुवात केली. त्याला जें अमृत सांपडलें तें आतां कोठें मिळेल ?

---



- लहान लहान मुलें एकटींच घरांत बसून बाहुल्या बोळकीं घेऊन कशीं दंग होऊन खेळत बसतात, कसलीच भीति किंवा काळजी नसते. पण तोंच आई तिथें आली कीं, सारीं खेळणीं भिरकावून ' आई आई ' करीत तिच्याकडे धांवत जातात. तुम्हीसुद्धां आज धनमान-यशाचीं खेळणीं घेऊन निश्चिंतपणें संसारांत गुंग होऊन खेळत आहांत. पण एकदां का त्या आनन्दमयी जगन् मातेचें तुम्हाला दर्शन झालें कीं मग धनमानयशांत तुम्हाला अजिबात गोडी वाटणार नाहीं. त्या साऱ्यांना दूर सारून तिच्याकडे हावभरीनें तुम्ही धांव घ्याल.

आत्मज्ञान म्हणजे काय ? आणि तें मिळवावयाचें झाल्यास
गुरु केलाच पाहिजे कीं काय, अशी
संशयबाधा झालेल्या साधकासाठीं हा उतारा आहे.

# उपनिषद्रहस्यांतला एक सुवर्णकण

**तत्त्वज्ञान व अनुभूतिशास्त्र—**

'आत्मा एकमेवाद्वितीय असून तो स्थूल व सूक्ष्म जग भरून राहिला आहे; त्याच्यापासूनच हें जग उत्पन्न होतें, त्याच्यामुळेंच जिवंत राहतें, व शेवटीं त्याच्यांतच लीन होतें,' ही आत्म्याची कल्पना प्रतिपादिण्याचा उपनिषदांतील सर्व तात्त्विक चर्चेचा मुख्य उद्देश आहे. या कल्पनेच्या साहाय्यानेंच परस्परविरोधी अशा अनेक धर्ममतांतील तीव्र व द्वेषमूलक भेद नाहींसे करितां येतात, व सर्व वस्तुमात्रांचें खरें अंतिम स्वरूप काय हें समजावून सांगण्यासाठीं प्रवृत्त झालेल्या अनेक दर्शनांची खरी योग्यताही या कल्पनेच्या कसोटीनेंच ठरवितां येते. प्रत्यक्ष आत्मज्ञानास उपयोगी अशा कांहीं सूचनाही उपनिषदांत अनेक ठिकाणीं केल्या आहेत. ब्रह्माविषयीं केवळ बौद्धिक ऊहापोह करूनच न थांबतां त्या ब्रह्माचें प्रत्यक्ष ज्ञान कसें मिळवावें व त्याचा साक्षात्कार करून घ्यावयाचा झाल्यास त्यास साधन कोणतें, याविषयींहि उपनिषत्कारांनीं बरेंच लिहिलें आहे. आत्मसाक्षात्कार हा विषयच असा आहे कीं त्याविषयीं उपनिषत्कालीन ऋषी आपण होऊन कांहीं सांगतील अशी अपेक्षा करणें व्यर्थ आहे. आपण स्वतः मिळविलेल्या प्रत्यक्ष सानुभव अन्तर्ज्ञानापुढें अप्रत्यक्ष बौद्धिक शब्दज्ञान जसें पंगु व हिणकस ठरतें, तद्वतच प्रत्यक्ष आत्मानुभूतीचें वर्णन शब्दांनीं करणें अपुरें व हीन ठरतें, ही गोष्ट उपनिषत्कालीन ऋषींस पूर्णपणें माहीत होती. म्हणूनच त्यांनीं आत्मज्ञानाचें विस्तृत वर्णन कोठेंहि न देतां सहज जातां जातां त्याविषयीं कांहीं उल्लेख केला असून तें ज्ञान मिळविण्याचा मार्ग नुसता दिग्दर्शित केला आहे. कोणत्याही वस्तूचें प्रत्यक्ष अस्तित्व व त्याविषयींचें ज्ञान यांमध्यें जितका फरक आहे तितकाच फरक प्रत्यक्ष अनुभव व त्याचें शाब्दिक वर्णन यांमध्यें आहे. खऱ्या परमार्थान्वेषी साधकांना बहुतेक अंधारमय अशा प्रवासांत परमार्थमार्गावर मार्गदर्शक दिवे कोठें आहेत हें समजावें म्हणून प्रत्यक्ष अनुभवाविषयींसुद्धां कांहीं सांगावयाचें झाल्यास तें प्रच्छन्नपणें व जपूनच सांगावें लागतें. म्हणून उपनिषदांत आत्मानुभवाविषयीं जें लिहिलें आहे तें वस्त्रांत गुंडाळलेल्या रत्नाप्रमाणें बौद्धिक वस्त्राखालीं झांकून ठेविलें असून तें पारखण्याची ज्यास नजर आहे त्यालाच तें दिसतें, व त्यालाच तें किती अमूल्य आहे हें कळतें.

**परा व अपरा विद्या—**

केवळ बौद्धिक तयारी कितीही केली तरी त्यामुळें प्रत्यक्ष आत्मज्ञान प्राप्त

होत नाहीं हें उपनिषत्कालीन आत्मज्ञांस पूर्णपणें माहीत होतें. ग्रीक तत्त्ववेत्त्यांनीं 'डॉक्सा' व 'एपिस्टेमी' म्हणजे नुसता तर्क किंवा अनुमान, व सत्यज्ञान यांमध्यें जो भेद मानिला आहे तोच उपनिषत्कारांनींही अपरा व परा म्हणजे कमी प्रतीच्या व श्रेष्ठ प्रतीच्या ज्ञानांमध्यें मानिला आहे. 'या जगांत दोन प्रकारच्या विद्या आहेत. एक अपरा म्हणजे हीन दर्जाची, व दुसरी परा म्हणजे श्रेष्ठ प्रतीची. वेद, व्याकरण, निरुक्त, छन्दस्, ज्योतिष् इत्यादि शास्त्रांचें ज्ञान होतें ती परा विद्या होय' असें मुंडकोपनिषदांत सांगितलें आहे. आत्मज्ञान शिकण्यासाठीं नारद आपला आध्यात्म गुरु सनत्कुमार याजकडे गेला असतां त्या उभयतांमध्यें जो संवाद झाला त्यांतही बुद्धिगम्य ज्ञान व अनुभवजन्य ज्ञान यांमधील विशेष फरक काय हें विशद करून दाखविलें आहे. 'आजपर्यंत तूं कोणत्या शास्त्रांचा अभ्यास केलास?' असा प्रश्न सनत्कुमार ऋषींनीं नारदास विचारिला, तेव्हां, 'मी सर्व वेद, इतिहास व पुराणें यांचा अभ्यास केला आहे. पितृविद्या, गणितशास्त्र, शकुनशास्त्र, तर्कशास्त्र, वेदविद्या, भूतविद्या, ब्रह्मविद्या, शस्त्रविद्या, मंत्रविद्या, नक्षत्रविद्या व कला या सर्वांचा अभ्यास केला आहे. परंतु या सर्व विद्या मला दुःखसागराच्या पैलतीरीं नेण्यास असमर्थ असल्यामुळें माझें अंतःकरण शोकाविष्ट झालें आहे.' असें नारदानें उत्तर दिलें. 'मीं अनेक मंत्रांचा अभ्यास केला असला तरी मला आत्मज्ञान झालें नाहीं, व आत्मज्ञानाच्या साहाय्यानेंच हा दुःखमय संसार तरून जातां येतो, असें आपणांसारख्या वंदनीयांच्या तोंडून मी ऐकिलें आहे. मी शोकसागरांत बुडत आहे. तरी आपण मला या अज्ञान व शोकसागराच्या पैलतीर न्यावें' अशी नारदानें सनत्कुमारांस प्रार्थना केली. या ठिकाणीं उच्चनीच प्रतीच्या ज्ञानांमधील फरक स्पष्टपणें दाखविला असून आत्मज्ञानास इतक्या उच्च आसनावर बसविलें आहे कीं त्याच्याशीं तुलना केली असतां सर्व बौद्धिक ज्ञान म्हणजे केवळ शाब्दिक जादुगिरी किंवा शब्दजाल आहे, अथवा नुसता शारीरिक शीण आहे असें वाटतें. आत्मज्ञानाविषयीं उपनिषत्कारांची दृष्टी किती अनुभविक व व्यवहार्य होती हें कठोपनिषदावरून दिसून येतें: 'हें शरीर जिवंत आहे तोंच आत्मज्ञान मिळविलें तर मनुष्यप्राणी जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटतो. कारण या जन्मीं जर आत्मज्ञान झालें नाहीं तर मरणानंतर कोणतीं संकटें कोसळतील याची कल्पनासुद्धां कोणास करितां येणार नाहीं' असें याच उपनिषदांत म्हटलें आहे. कठोपानिषदांत हीच कल्पना किंचित् निराळ्या रीतीनें मांडली आहे. 'इहलोकीं हें शरीर मृत होण्यापूर्वींच जर आत्मज्ञान मिळवितां आलें नाहीं, तर मनुष्यास पुनः पुनः जन्मून शरीरधारण करावें लागतें.'

**आत्मज्ञानास लागणारे गुण—**

आता येथें असा प्रश्न उद्भवतो कीं याच देहीं व याच जन्मी जर आत्मज्ञान मिळवितां येतें तर सर्व लोकांस तें याच जन्मीं कां प्राप्त होत नाहीं? किंवा कांहीं विशिष्ट लोकांनाच आत्मज्ञान होतें असें मानिलें तर हें ज्ञान

संपादण्यास त्यांच्या अंगीं कोणतें गुण असावे लागतात ? परमार्थास कोणत्या गुणांची आवश्यकता आहे याविषयीं उपनिषदांत अनेक ठिकाणीं विवेचन केलें आहे. परमार्थसाधकास अवश्य लागणारा पहिला गुण म्हणजे आत्मनिरीक्षण असें कठोपनिषदांत म्हटलें आहे. परमेश्वरानें इंद्रियें उत्पन्न करतेवेळींच त्यांस पराङ्मुख केलें. म्हणून मनुष्याची दृष्टि अंतर्मुख नसून बहिर्मुख असते. अमरत्व मिळविण्याची इच्छा असलेला एखादा विरळा ज्ञानी मात्र आपली दृष्टि अंतर्मुख करून ती अंतरात्म्याकडे लावितो. श्वेताश्वेतरोपनिषदांत इंद्रियांच्या या बहिर्मुखतेचाच उल्लेख केला असून नवद्वारयुक्त या शरीर किल्ल्यांत कोंडलेला अंतरात्मा प्रतिक्षणीं या तुरुंगाबाहेर पळत जाण्याचा प्रयत्न करीत असतो असें या उपनिषदांत म्हटलें आहे. वांकलेली काठी सरळ करण्याकरितां ती ज्याप्रमाणें उलट वांकवावी लागते, त्याप्रमाणें पूर्णपणें अंतर्मुख होण्यासाठीं साधकास प्रथम आपल्या स्वतःस बाह्य जगतापासून कोंडून घेणें आवश्यक वाटतें. ही अंतर्मुखतेची पहिली पायरी. यापुढची पायरी म्हणजे आत्मशुद्धीची. मनुष्य कितीही बुद्धिमान् असला तरी त्यानें दुष्टाचरण सोडल्याशिवाय व त्याचें मन पूर्णपणें शांत व सुसमाहित झाल्याशिवाय केवळ प्रज्ञेच्या जोरावर त्याला आत्मज्ञान मिळवितां येणार नाहीं, असें कठोपनिषदांत सांगितलें आहे. सत्य, तपाचरण, सम्यग्ज्ञान व अखंड ब्रह्मचर्य हे गुण आत्मविकासास आवश्यक आहेत असें मुंडकोपनिषत्कारांचें मत आहे. आत्मा केवळ प्रवचनानें, कुशाग्र बुद्धीच्या साहाय्यानें किंवा बहुश्रुतपणानें प्राप्त होत नाहीं व तो बुद्धीच्या पलीकडे कसा आहे हें याच उपनिषदांत विशद करून सांगितलें आहे. केवळ बुद्धिगम्य ज्ञान भयप्रद आहे असें कठोपनिषदाप्रमाणें ईशोपनिषदांतही प्रतिपादिलें आहे. अज्ञानापेक्षां अशा प्रकारचें ज्ञान अधिक भयंकर आहे. कारण जे अज्ञानमार्गानें जातात ते मरणानंतर 'अंधंतमस' ला जातात; परंतु ज्यांना आपल्या ज्ञानाचा गर्व वाटतो ते याहीपेक्षां जास्त तमोमय लोकास जातात असें या उपनिषदांत म्हटलें आहे. कठोर परमार्थ आचरण्यास आवश्यक लागणारी दृढता व चिकाटी ज्याच्या अंगीं नाहीं अशा बलहीन मनुष्यास, व जो आयुष्यांत नेहमींच चुका करतो त्यास आत्मप्राप्ति होत नाहीं. याच उपनिषदांत आत्मज्ञानास आवश्यक असे आणखी कांहीं गुण सांगितले आहेत. 'आपल्या कर्मानुसार योग्य अशा लोकीं जन्मल्यावर, त्याचा वीट आल्याशिवाय व कर्मानें—मग तें कितीही चांगलें असो—कर्मातीत लोक मिळणें केव्हांही शक्य नाहीं, अशी मनाची पक्की खात्री झाल्याशिवाय, म्हणजे आत्मज्ञान हें कर्मापेक्षां श्रेष्ठ आहे हें पटल्याशिवाय कोणाही साधकास अध्यात्मप्रदेशांत पाऊल ठेवण्यास हक्क पोंचत नाहीं. या प्रदेशाचा शोध लावून त्याचें ज्ञान मिळवावयाचें झाल्यास साधकास आत्मानुभवी गुरूकडेच हातांत समिधा घेऊन अति नम्रपणें गेलें पाहिजे. याप्रमाणें अंतर्मुखता, जगाचा वीट, पावित्र्य, नम्रपणा, शांति, सत्य, तपश्चर्या, सम्यक् ज्ञान, बल व योग्य कर्मानुष्ठान हे सर्व गुण आत्मज्ञान मिळविण्यास आवश्यक आहेत असें उप-

निषदांत सांगितलें आहे. हे गुण संपादन केल्याशिवाय साधकास आत्मज्ञान प्राप्त होत नाहीं.

## गुरूपदेशाची आवश्यकता—

नैतिक सद्‌गुण संपादन करून परमार्थाची पूर्वतयारी पूर्ण झाली म्हणजे योग्य सद्‌गुरूकडून उपदेश घेणें ही त्यापुढील पायरी होय. गुरूपदेश जरूर पाहिजे असें उपनिषदांत वारंवार अनेकदां सांगितलें आहे. 'आपणासारख्या वंदनीय आत्मज्ञानीं गुरूकडून उपदेश घेतल्यानेंच आत्मज्ञान प्राप्त होतें' असें सत्यकामानें आपल्या गुरूस सांगितलें, तेव्हां त्यानें आपलें स्वतःचेंच मत प्रकट केलें नसून अनेक लोंकांचेंही मत प्रदर्शित केलें आहे. निसर्गतःच पाण्याचा प्रवाह उंच प्रदेशाकडून सखल प्रदेशाकडे वाहात जातो. त्याप्रमाणें आत्मज्ञान श्रेष्ठ मनुष्यापासून कनिष्ठ प्रतिच्या मनुष्यास मिळतें असें कठोपनिषत्कारांचें मत आहे. 'गुरु जर खरोखरच मोठ्या योग्यतेचा नसेल तर आत्मज्ञान होणें कठीण. म्हणून स्वतः आत्मरूप असल्याचा अनुभव ज्यानें घेतला असेल अशा गुरुकडून उपदेश मिळाल्याशिवाय या अतर्क्य व सूक्ष्म परमार्थमार्गाचें ज्ञान होणार नाहीं. दुसऱ्यानीं सांगितल्याविना आत्मज्ञान शक्य नाहीं. तेव्हां केवळ तार्किकी काथ्याकूट करण्यांत आपल्या बुद्धीचा अपव्यय करूं नये' असें कठोपनिषत्कारांनीं सांगितलें आहे. याच उपनिषदांत पुन्हां म्हटलें आहे कीं "उठा, जागे व्हा, व आपल्यापेक्षां जे श्रेष्ठ असतील त्यांच्यापासून ज्ञान मिळवा." कारण आत्मज्ञानाचा मार्ग वस्तऱ्याच्या तीव्र धारेप्रमाणें कठीण आहे. म्हणून त्यास तज्ज्ञांनीं 'दुर्गम पंथ' असें जें म्हटलें आहे तें अगदीं योग्य आहे. मनुष्यास स्वतःच्या वैयक्तिक प्रयत्नानें आत्मज्ञान प्राप्त होत नाहीं, हें या व इतर अनेक उताऱ्यांवरून सिद्ध होतें. कारण, हें ज्ञान इतकें सूक्ष्म व गूढ आहे कीं, तें केवळ स्वतःच्या प्रयत्नानें संपादण्याची आशा करणें अगदीं व्यर्थ आहे. आतां हें ज्ञान मिळविण्याकरितां ज्या गुरूकडे जावयाचें त्यास स्वतःचा आत्मा व ब्रह्म हें एक असल्याचें सानुभव ज्ञान झालें असलें पाहिजे. कारण अशा ऐक्याचा अनुभव स्वतः न घेतां, म्हणजे अद्वैत ज्ञानाच्या उच्च पदावर आपण आरूढ न होतां, एखाद्या गुरूनें जर कोणास आत्मज्ञानाचा उपदेश केला तर तो उपदेश फलद्रूप होणार नाहीं.

'परमार्थज्ञान मिळवावयाचें झाल्यास गुरु केलाच पाहिजे,' याविरुद्ध कित्येकांचा आक्षेप असून केवळ पुस्तकांच्या साहाय्यानें हें ज्ञान कां मिळवितां येऊं नये असा त्यांचा प्रश्न आहे. पुस्तकी ज्ञान व प्रत्यक्ष गुरूच्या तोंडून ऐकिलेलें ज्ञान या दोहोंमधील महदंतर दाखविण्याच्या उद्देशानें प्लेटोनें केलेली या दोन्ही ज्ञानांची तुलना या आक्षेपकांनीं जरूर वाचावी. पुस्तकी ज्ञान निर्जीव असतें, तर दुसरें ज्ञान म्हणजे गुरूच्या पूर्ण विकास पावलेल्या जीविताचा निष्कर्ष असतो. म्हणून या दोन ज्ञानांत महदंतर असतें. परमार्थ मार्गांत प्रत्यक्ष कांहीं अडचणी आल्या असतां पुस्तकांच्या साहाय्यानें त्या दूर होतील अशी अपेक्षा करणें व्यर्थ आहे. तेंच परमार्थ मार्ग प्रत्यक्ष चोखाळलेले सद्‌गुरू आपल्या शिष्यास अध्यात्मपूर्णतेच्या सोपानपंक्तीवरून हळू हळू एक एक पायरी चढवीत नेतील यांत कांहीं शंका नाहीं.

---

प्रत्यक्ष पांडुरंगाची पत्नी, पण पाडुरंगाचें वैभव तिच्या दृष्टीससुद्धां पडत नाहीं ! मंदिरांत पाऊल ठेवलें कीं, भिंतीवर डोकें आपटण्याची भिती. इतका अंधार आहे रुक्मिणीच्या 'महालांत'! नवऱ्याला टाकून गेलेल्या स्त्रीची कशी अवस्था होते याचेंहें जणूं प्रतीक, कीं पांडुरंगाशीं भांडल्याबद्दल वडव्यांनीं दिलेली तिला शिक्षा ! कुणास ठाऊक !

# चंद्रभागेच्या कांठीं

लेखक : श्री. भालचंद्र पाटील

**सुंदर तें ध्यान उभे विटेवरी ।**
**कर कटावरी ठेवोनियां ॥**

**तुळशी हार गळां कांसे पीतांबर ।**
**आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥**

लहानपणीं म्हणजे वयाच्या सातव्या आठव्या वर्षापासून हा अभंग मी ऐकत आलों आहे. आम्हीं राहात होतों त्या चाळींत कांहीं वारकरी मंडळी राहात होती. गुरुवारीं आरती भजन व्हायचें. एकादशीला तर जागरण करीत असत. त्यांतील एका स्त्रीचें नांव होतें यल्लाम्मा ! पण आम्ही तिला येल्लुबाय म्हणत असूं. व पुरुषाचें नांव होतें तुकाराम ! चाळींतील सर्व लहान थोर त्यांना तुकारामदादा म्हणून हांक मारीत. ते अगदीं एकटे रहात होते. आणि हा त्यांचा कार्यक्रम नियमानें होत असे. संगीताची पहिली ओळख मला येथनच्च झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. एकादशीला खरीं मजा यायची. चाळींतील सर्व मंडळी भजनाकरितां येत. आम्हीं मुलें जागरण करीत असूं पण ते भजनाकरितां नव्हे, तर देवासमोर फळांची जी खिरापत (प्रसाद) ठेवलेली असे ती केव्हां मिळते याकडे आमचें खरें लक्ष लागलेलें असे. रामनवमी, दत्तजयंति, हनुमानजन्म, कृष्णाष्टमी हेहीं कार्यक्रम होत असत. कृष्णजन्माचा सोहळा तर अत्यंत उत्साहानें पार पडायचा. दिवसभर महाभारत वाचन, रात्रीं जन्म, आरति, भजन दुसरे दिवशीं काला. चाळींतील सर्वांना आग्रहाचें आमंत्रण असायचें पण त्यावेळीं रोटी—व्यवहारआमच्या इतका उदार नव्हता. त्यामुळें येल्लूबायनीं कितीही आग्रह केला तरी कृष्णा इतके आम्ही 'सुधारलेले' नसल्यानें तो सोहळा फक्त पहात असूं.

## बालपणाची पंढरी

याच काळांत मी प्रथम पंढरपूर हें नांव ऐकलें. दर आषाढीं कार्तिकीला ही वारकऱ्यांची दिंडी वडाळा येथें येत असे. आदल्या रात्रीं ही मंडळी निघत. पण जातांना आम्हां मुलांना सांगत, 'आम्ही पंढरपुरला वारीसाठीं चाललों काय येतां कां?' अर्थात्‌च इतक्या लांब चालत जायचें तें वय नसल्यानें आम्हीं जात नसूं. पण ही पर्वणी आली कीं आम्हां मुलांना खूप आनंद व्हायचा. कारण तोहि एक सोहळाच ! हीं पांच पंधरा माणसें निघायचीं तीं काय तोंड मिटून ! प्रत्येक बिऱ्हाडकरूंचा निरोप घेत घेत, मुलांपुढें 'त्या' पंढरीचें वर्णन करीत करीत ! तीं चंद्रभागा 'तें राऊळ, तो विठोबा, काय आणि किती, आम्ही मुलें हरखून जायचीं. त्यांतच 'चल आमच्या बरोबर' म्हणून माझ्या सारख्याला म्हटलें कीं, मी जायला एका पायावर तयार असायचा. पण दोन्ही पाय त्यावेळीं अशा कामीं निरुपयोगी म्हणून हुरहुरण्यापलिकडे मला कांहीं करतां येत नसे; पण जातांना येल्लुबाय आम्हां सर्व मुलांना एक एक पैसा देऊन जायची आणि 'दुःखाचा बराचसा भार' तात्पुरता तरी कमी व्हायचा ! पण पंढरपुरला जायची आपली इच्छा आपण केव्हां तरी पूर्ण करायची असा जणूं संकल्प मी त्याच वेळीं केला होता. तो पूर्ण करण्याची संधि, एक तपानंतर या रेल्वेतील नोकरीनें मला अनायासें आणून दिली.

नोकरीला लागल्यानंतर अगदीं पहिली सफर पंढरपुरला झाली, ती योगायोगानें. १९४७ सालच्या ऑक्टोबर किंवा नोव्हेंबरमध्यें माझे एक समव्यवसायी मित्र कुटुंबासह आपल्या मातोश्रींना घेऊन निघाले. त्यांच्या बरोबर त्यांचा भाऊ म्हणजे माझा मित्रही निघाला. त्याच्या बरोबर मीही निघालों. दरम्यान १२।१३ वर्षांच्या अवधींत, विचारांत आणि दृष्टींत कांहींसा फरक पडला होतांच. पण आकर्षण कमी झालें नव्हतें. त्याला कारणही तसेंच होतें. शाळेंत असतांना मला कथाकीर्तनें ऐकण्याची संवय लागली होतीं. त्यांपैकीं टोपडेबुवा या नांवाचे हरिदास आपल्या विवेचनांतून पंढरपुराचें वर्णन नेहमीं करीत. तें ऐकून माझी जाण्याची इच्छा दृढमूल झाली होती.

मी नास्तिक कीं आस्तिक? मला ठाऊक नाहीं. बुद्धी प्रामाण्यवाद हा कितीही तर्कशुद्ध असला तरी भावना ही बुद्धीची अधिष्ठात्रीं असली पाहिजे. ज्ञानाचें साधन म्हणून बुद्धीचें महत्त्व असले तरी भावनेची जोड नसेल तर हीं दोन्हीं साधनें निरुपयोगी नाहीं तरी निष्प्रभ ठरतात. मग अशा स्थितींत नास्तिक कीं आस्तिक या प्रश्नाचें ठीक उत्तर कसें देतां येणार? पंढरपूर अथवा अन्य क्षेत्रीं जाणारा माणूस आस्तिकच असेल किंवा असला पाहिजे असें थोडेंच आहे? किंवा रूढ अर्थानें मान्य असलेल्या एखाद्या नास्तिकानें तेथें जाऊंच नये, जाण्याची गरजच नाहीं असेंही म्हणतां येणार नाहीं. मग कसलाही नित्य नियम, धार्मिक आचार फारसे न पाळणारा माणूस पंढरपुराला किंवा हरिद्वारला एवढ्या उत्साहानें कां जातो? त्याला कारण आहे!

## भीमा आणि चंद्रभागा

पंढरपूर येथें जाण्यापूर्वीं त्या क्षेत्राविषयीं जसें आकर्षण माझ्यांत निर्माण झालें होतें,

तसेंच कांहीं विकृत समजहि माझ्या कानावर आले होते. त्यांपैकीं प्रत्यक्ष तेथें गेल्यानंतर कांहीं खरे ठरले तर बरेचसे खोटे ठरले.

रात्रींच्या मद्रास मेलनें निघून, पहांटे कुर्डूवाडी येथें गाडी बदलून, बार्शी लाईट (आतांच्या सेंट्रल) रेल्वेनें पंढरपूर येथें सकाळीं ९–९॥ च्या सुमारास उतरलों. 'फुकट' प्रवासी आम्हीं दोघेच. मी व ते व्यवसायी मित्र. माझ्या मित्राप्रमाणें इतरांना तिकीट घेऊन निघावें लागलें. त्याचा आजचा दर रु. ८–११–० असा आहे. पंढरपूर स्टेशन जवळ येऊं लागलें कीं वाटेंतच प्रथम चंद्रभागेचें दर्शन घडतें. 'भीमा आणि चंद्रभागा, तुझ्या चरणींच्या गंगा' तीच ही चंद्रभागा. नांवाप्रमाणेंच तिचा आकार आणि वळण आहे. हें गाडींतूनच स्पष्ट आणि उत्तम दिसतें. तें वाळवंट, तें पुंडलिकाचें देऊळ, तें गोपाळपूर सारीं स्पष्ट दिसतात. त्या दर्शनानें पूर्वस्मृति खडबडून जाग्या होतात, आणि...! आणि हात नकळत जोडले जातात.

स्टेशनमध्यें उतरल्यावर टांगे आणि खटारे हीं दोनच वाहनें दृष्टीस पडतात. टांगा माणसी आठ आणे भाडें आकारतो तर तेवढ्याच 'आकारांत' सबंध खटारा मावूं शकतो. आणि सामानाच्या दृष्टीनें तो सोयिस्करही पडतो. स्टेशनपासून गांवाची हद्द फर्लांग, दीड फर्लांग होईल. पण मुख्य ठिकाण म्हणजे विठ्ठल मंदिर. चंद्रभागा हीं सुमारें मैलभर आंत आहे. या दृष्टीनें राहाण्याची सोयीस्कर जागा म्हणजे 'नामदेव मंदिर धर्मशाळा' ही सर्वोत्कृष्ट आहे. तसें म्हटलें तर राहाण्याचीं ठिकाणें भरपूर आहेत. विशेषतः गाडगे महाराजांची धर्मशाळा उल्लेखनीय आहे. तथापि ती मुख्य ठिकाणापासून दूर असल्यानें थोडी गैरसोयीची वाटते. हिच्याच समोरच्या बोळामागें 'त्वष्टा कांसार ज्ञाति धर्मशाळा' आहे. नामदेव मंदिर, चंद्रभागा व महाद्वार यांच्यामध्यें आहे. आणखीहि एक ठिकाण परवां 'महाराष्ट्र साहित्य संमेलना'च्या निमित्तानें मी गेलों असतांना सांपडलें. तें म्हणजें श्रीधराश्रम, कुंभारघाट, येथील नारायणशास्त्री नाझरकर यांचा वाडा. या वाड्यांतील कांहीं खोल्या ते कोणतेंहि ठराविक मूल्य न घेतां, आपल्या इच्छेनुसार दिलेल्या मोबदल्यांत देत असतात. हा वाडा चंद्रभागेच्या अगदीं तिरावर आहे. खोलींत बसून वाळवंटावरील सर्व मौज पहावयास मिळते. इतर वाड्यां-प्रमाणें ते नाहींत, याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

## संतांचें पुण्यस्मरण

उतरण्याची सोय झाली कीं पहिलें काम चंद्रभागेचें स्नान. वाळवंटावर पाऊल ठेवलें कीं भिक्षुक, भिकारी प्रथम तुमचें स्वागत करतात. पण अलिकडे त्यांचा त्रास कमी झाला आहे. त्यानंतर देवळें! पुंडलिकाचें देऊळ, तुकारामाचें देऊळ, आणखी कितीतरी!! प्रत्येक ठिकाणीं मोक्षाच्या मार्गावरील मार्गदर्शक आपल्या सेवेसाठीं तत्पर असतात. पुढें चंद्रभागा नदीचें पात्र. तें फारसें खोल नाहीं. कमरेइतक्या पाण्यांत स्नान करायचें. वाळवंटावर उभें राहून चंद्रभागेकडे पाहिलें कीं, अनेक चित्रें नजरेसमोर उभीं राहतात. ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम, चोखामेळा, नरहरी सोनार

गोरा कुंभार, सांवता माळी, जनाबाई, कान्होपात्रा, रांगेनें एका पुढें एक दिसूं लागतात. याच वाळवंटावर त्यांनीं आपल्या जीवनाचा डांव मांडला. 'वाळ वंटी, चंद्रभागेच्या कांठीं, डाव मांडीला. या इथें ते खेळले. आणि त्यांत ते यशस्वी होऊन गेले. हीच ती चंद्रभागा. हिच्याबद्दल एक अपसमज प्रसृत होता. नाशिकच्या गोदावरीप्रमाणें लोक आपलें 'प्रातःकर्म' हिच्या कांठावर उरकून घेतात. यामुळें हिच्या पाण्यांत नेहमीं घाण, कचरा पडलेला असतो. पण ही गोष्ट अगदीं खोटी आहे. पंढरपुराचें माझ्या कल्पनेंत जें चित्र होतें त्यापेक्षां कितीतरी वेगळेपणा प्रत्यक्ष तेथें गेल्या-नंतर अनुभवास आला. पुणें–सातारा याप्रमाणेंच पंढरपूर हें एक शहरवजा गांव आहे. इलेक्ट्रिसिटी, पाण्याचे नळ, रस्ते, घरें, चित्रपटगृहें, दुकानें, आदि आधुनिक सोयींनीं युक्त असें तें शहर आहे. मुंबई–पुण्याकडील माणसाला तेथें कंटाळवाणें वाटत नाहीं. मुंबईच्या चौपा-टीची उणीव चंद्रभागेच्या वाळवंटानें भरून काढली आहे. अपरात्रीं एकटें फिरण्याचीं भीति इतर ठिकाणांप्रमाणें येथें वाटत नाहीं. याप्रमाणें बरेचसे अप-समज वर लिहिल्याप्रमाणें खोटे ठरले. तर कांहीं अनुभवान्ती खरें ठरले. त्याचा एक मासला वाळवंटावरच पहा-वयास मिळाला. शंकराचें लहानसें मंदिर! मंदिर कसलें!! धर्माच्या जुगाराचा अड्डाच तो! पिंडी समोर लहानशा खोलगट चौकोनांत पाणी, त्या पाण्यावर दगडी नाव तरंगते, आणि हा म्हणे ईश्वरी चमत्कार! म्हणून दानांची भरपूर खैरात करावी ही तेथील दलालांची अपेक्षा. हातचलाखी, नजरबंदी फक्त पत्त्यांच्या जुगारांत चालते असें नाहीं. देवाच्या 'पत्त्यावर' चाललेला तो खेळ आम्ही इथें पाहिला. एका पेटीवर पैशाची थाळी, थाळीखालीं पैसा आणेलीसारखी नाणीं, पण थाळींत रुपये, अधेल्या या सारखीं नाणीं, हीं नाणीं हातांत ठेवायचीं व कुणी कांहींही दिलें कीं हातांतला रुपया थाळींत सर्वांदेखत फेकायचा, म्हणजे इतरांनीही त्याचें अनुकरण करावें ही त्यांतली खुबी. आमच्या समोर एका वृद्ध स्त्रीनें एक पैसा थाळींत टाकला. त्यांतील एका गृहस्थानें तो पैसा उचलून फेंकून दिला व म्हटलें, 'निघा इथून, आम्हीं काय भिकारी आहोंत पैसा घ्यायला!' मला संताप आला त्याचा. मी म्हटलें,. 'अहो, भिकाऱ्यापेक्षांही भिकारी आहांत तुम्ही. भिकाऱ्यांनीही तुम्हांला दानधर्म करावा एवढी सुद्धां लायकी नाहीं तुमची. तिनं तो पैसा तुम्हांला नव्हता दिला. भक्तिनें तो देवाला दिला होता. तो घ्यायचा नव्हता. पण तुम्हीं फेकून देण्याचा उद्धटपणा केलात, आणि तोहि देवाच्या नांवाखालीं!' या प्रमाणें कांहीं वेळ हुज्जत घालून आम्ही तेथून बाहेर पडलों.

### ही ताटातूट कां?

पुढें बाजार पेठ. हारीनें एका शेजारीं प्रसादाची, अबीर, कुंकू यांचीं दुकानें आहेत. दुकानांना लागूनच असलेल्या रस्त्यावर महाद्वार! हार फुलें घेऊन माळणी बसलेल्या असतात. महाद्वारा-समोर चोखोबांची समाधि. पांडुरंगाच्या हृदयांत यांना स्थान मिळालें, पण त्यांच्या समाजदेहाला अजूनही मंदिरांत प्रवेश

मिळाला नाहीं, याची ही समाधि निदर्शक आहे. मंदिराची पहिली पायरी नामदेवांची समाधी. तिचें दर्शन घेऊन आंत प्रवेश करायचा. आंत गेल्यावर एक चौक लागतो. तो ओलांडून पलिकडे गेल्यावर मुख्य मंडप. मंडपांत सोळा खांब आहेत. पुढें गाभारा. गाभाऱ्यांत एकटा पांडुरंग उभा आहे. ' वामांगिं रखुमाई दिसे दिव्य शोभा ' ती इकडे नाहीं. रुक्मिणी एकदां रागावून दिंडीरवनांत निघून गेली ती अजून आलीच नाहीं ! हें दिंडीरवन वाळवंटावर एका बाजूस आहे. प्रत्यक्ष पांडुरंगाची पत्नी, पण पांडुरंगाचें वैभव तिच्या दृष्टीस सुद्धां पडत नाहीं. मंदिरांत पाऊल ठेवलें कीं, भिंतीवर डोकें आपटण्याची भीति. इतका अंधार आहे रुक्मिणीच्या ' महालांत '! नवऱ्याला टाकून गेल्यावर स्त्रीची कशी अवस्था होते याचें हें जणूं प्रतीक कीं पांडुरंगाशीं भांडल्याबद्दल बडव्यांनीं दिलेली शिक्षा ! कुणास ठाऊक !

पांडुरंगाचें वैभव तर कांहीं विचारूं नका. त्याच्या दर्शनासाठीं प्रथम रांगेंत उभे राहावें लागतें. आंत गेल्यावर तुम्हीं बडव्याचे हातावर जें ठेवाल त्यावर तुमच्या दर्शनाची वेळ अवलंबून असते. कांहींच न दिल्यास नारळाप्रमाणें तुमचें मस्तक पांडुरंगाच्या पायावर अक्षरशः आपटून फुटलेला नारळ ज्याप्रमाणें भिरकावून द्यावा त्याप्रमाणें तुम्हांला ढकललें जाईल. हा सर्व त्रास चुकवावयाचा असेल तर एखाद्या ' कमिशन एजंटला ' गांठून आपली सोय लावली पाहिजे. तुमच्या भक्तिभावनेच्या पुष्पांना, हारांना, कांहीं किंमतच नाहीं तिथें ! अक्षरशः कचऱ्याप्रमाणें ते मूर्तीच्या मागें फेकले जातात. कारण मूर्ती सजवलेली असते. तिच्यावर हा ' कचरा ' टाकून विद्रूप करायची नसते ! नुसता बाजार आणि सौदा !

## गाडगे महाराजांचें विठ्ठल मंदिर


याच्या अगदीं उलट गाडगे महाराजांच्या धर्मशाळेंतलिं विठ्ठल मंदिर! प्रशस्त सभा मंडप, गाभारा, गाभाऱ्यांत मूर्ति, मूर्तिजवळ कुणी नाहीं, पुजारी नाहीं, आणि आचारी नाहीं. गोंधळ नाहीं, गडबड नाहीं, सारें शांत, निस्तब्ध ! उदात्त आणि पवित्र, गंभीर. कुणी कुणाला कांहीं द्यायचें नाहीं कीं कोणाकडून कांहीं घ्यायचें नाहीं ही महाराजांची सक्त आज्ञा ! जें कांहीं देणें असेल तें कचेरींत नेऊन द्या आणि अधिकृत पावती घ्या. खरें भक्तिमय वातावरण येथें आहे. सोज्वळ आणि सात्विक स्वरूप येथें साकार झालें आहे. पंढरपुरांतील रमणीय ठिकाणें कोणतीं? असा प्रश्न कुणी केला तर मी दोनच सांगेन. एक ही धर्मशाळा व दुसरें गोपाळपूर !

स्वादिष्ट स्वयंपाका साठीं
प्रताप
छाप हिंग वापरा
गोपालजी आणि कं.
२१८, सॅम्युअल स्ट्रीट, वडगादी, मुंबई - ३.

गोपाळपूर येथें चंद्रभागेतून नावेनें जावें लागतें. अंतर फार नाहीं. दहा एक मिनिटांत तेथें जाऊन पोहोंचतों. वाटेंत पाण्यांतच नारदाचें मंदिर लागतें. कलह लावणारे हे गृहस्थ ' पाण्यांत असून सुके ' राहूं इच्छितात कीं काय कोण जाणे ! ! गोपाळपूर येथें गेल्यानंतर संगमावर स्नान केल्यानंतर ' विष्णुपद ' या ठिकाणीं श्राद्धकर्म, पिंडदान वगैरे धार्मिक विधि केले जातात. पुढें कांहीं अंतरावर गोपाळपूर हें ठिकाण आहे. किल्ल्याप्रमाणें दिसणारा एक वाडा. वाड्याच्या पहिल्या पायरीवर संत भानुदासांची समाधि. ! आंत गेल्यावर एकीकडे दगडांची भांडीं, संसारांतील कांहीं वस्तु, जातें, इत्यादि दृष्टीस पडतात. हा सर्व संसार जनाबाईचा असें सांगितलें जातें. भुयाराप्रमाणें दगडी जिना उतरून खालीं गेलें कीं खोलीच्या एका कोपऱ्यांत अंधारांत फाटक्या गोधडीचा तुकडा दाखविला जातो. त्याला ' जनीची वाकळ' म्हणतात. पण गोपाळपूर हें रमणीय ठिकाण आहे असें म्हटलें याचें कारण, गच्चीवर गेल्यानंतर सभोंवार एकदां नजर टाकली कीं निघावेसें वाटत नाहीं. खालून गेलेली मंगळवेढ्याची सडक, बाजूचीं खेडेगांवें, त्यांतील विस्तीर्ण माळ, शेतें, समोरचे डोंगर, जवळच असलेलें पंढरपूर, चंद्रभागा, वाळवंट. मुंबईच्या मलबार-हिलवरून चौपाटीवरील देखावा कसा दिसतो याची कल्पना करा. मग रसिक मनाला मोह न पडला तरच नवल !

पंढरपुरास आतांपर्यंत तीनदां गेलों. पण या दोनच ठिकाणांची मोहिनी माझ्या-वर कायम आहे. आणि म्हणूनच आंधळया श्रद्धेनें नव्हे तर डोळस रसिक-तेनें या गंमतीचा आस्वाद घेण्याकरितां मी पुनः पुन्हां पंढरपुरास जाईन.

---



- येशू ख्रिस्त एक दिवस समुद्रकांठीं फिरत असतां एक शिष्य येऊन त्यांना म्हणाला, 'प्रभो, काय केलं असतां ईश्वराचं दर्शन होईल बरं ?' त्यांनीं तत्क्षणीं त्या शिष्याला पाण्यांत नेऊन आंत बुडवून ठेवलें आणि थोड्या वेळानंतर हात धरून त्याला बाहेर काढून विचारलें, 'आंत कसं काय वाटत होतं तुला ?' शिष्यानें जबाब दिला, 'प्राण जातो कीं राहतो असं वाटून कशी नुसती तडफड चालली होती.' प्रभु येशु त्याला म्हणाले, 'जेव्हां तुझा प्राण भगवंतासाठीं असा कासावीस होईल तेव्हांच त्याच्या दर्शनाचा तुला लाभ होईल !'

श्रीदासगणू यांनीं केलेली प्रचंड काव्यरचना आणि तिचें स्वरूप
पाहून 'संतकवि' पदावर त्यांच्याइतका प्रबळ अधिकार
महिपतीनंतरच्या काळांत कोणाचा सिद्ध होईल
असें मला यथार्थपणें वाटत नाहीं.

# एक अपूर्व योग !

लेखक : **दत्तो वामन पोतदार**

एक अपूर्व योग ! कारण या योगामुळें अठ्ठेचाळीस वर्षांपूर्वीच्या माझ्या आयुष्यांतील प्रसंगांचें स्मरण जागृत झालें. श्रीदासगणूमहाराज यांचें प्रथमदर्शन त्यावेळीं झालें. पण तें कसें ? ती थोडीशी सांगण्यासारखी कथा आहे. आम्ही त्या वेळीं पुणें शहरांत जोगेश्वरी नाक्याचे समोर किबेवाड्याशेजारच्या ढवळे (आतां करळे) वाड्यांत रहात होतों. त्या वाड्यांत भररस्त्यावर तळमजल्यावर विशा (विश्वनाथ) बापटाची खाणावळ होती. तिला लागून आमच्या विन्हाडाला जाण्यासाठीं तोडून दिलेला जिन्याचा खण होता. या खणांत आमच्या एका गिन्हाईला रात्रीं निजण्याची परवानगी द्याल काय, म्हणून खाणावळ मालकानें मला विचारलें. यावेळीं माझ्या आजच्या आठवणीप्रमाणें मी इंटरच्या वर्गांत (१९०८) शिकत होतों. मी ती परवानगी वडिलांस सांगून दिली. एका रात्रीं पाहतों तों हे पाहुणे उशाशीं मेणबत्ती ठेवून कांहीं लिहित आहेत ! त्यावरून थोडी अधिक लगट केली तों दिसलें कांहीं ओव्या रचून लिहित आहेत. या पहिल्याच भेटींत या मोंगलाई पाहुण्याविषयीं माझा अनुकूल ग्रह झाला आणि मी वडिलांच्या संमतीनें पाहुणेबुवांना आमच्या माडींतच जागा दिली. आमचे वडीलहि परमार्थप्रवण, सच्छील, वेदान्ती, कै. श्री. महर्षि अण्णासाहेबांचें शिष्य. तेव्हां हे नवे पाहुणेबुवा आणि ते यांचें उत्तम जमलें. मग माझे मित्र कै. दत्तो श्रीराम जोशी, खवलीकर इनामदार हे बुवांचे लेखक बनले. 'संतकथामृत' ग्रंथाचें लेखन चालू असावें. रोज जोशीबुवा, मी आणि बुवा यांची चर्चा–टीका–विनोद चाले. बुवांचा बराच काळ त्यांचे विष्णुसहस्रनामस्तोत्रपठनादि नित्य कर्मांत जाई आणि बाकीच्या वेळांत ते वडिलांशीं वेदान्त चर्चा करीत. बुवांनीं त्यावेळीं व्यंकटराव रामचंद्रकृत उपनिषदांची सभाषांतर आवृत्ति मिळविली होती आणि तीर्थरूपांकडून त्यांतील सर्व विषय ते समजावून घेत. या चर्चेचें फळ म्हणून नानासाहेब चांदोरकरास श्रीसाईबाबांकरवीं वदविलेला वेदान्तविवरणोपदेश. या विषयाचे तीन चार अध्याय झालेले

आम्हीं वाचले. याच चर्चेत नगरजिल्हा-नमन, इतिहाससंशोधन वगैरे चर्चा चाले. आणि भरींत भर अशी कीं कै. विसुभाऊ राजवाडे हे मी त्यांस १९०६ चे साहित्य संमेलनांत गांठल्यानंतर पुन: आपले सतीर्थ्य जे आमचे तीर्थरूप त्यांच्या भेटीस माझ्या ओढीमुळें येऊं लागले. जेव्हां प्रथम असा प्रसंग आला कीं बुवांचा आणि या मुनीचा तळ आमच्याच घरीं एकाच वेळीं पडणार, तेव्हां मला मोठीं चिंता उद्‌भवली. तथापि बुवांना मीं आगाऊच पढवून जागृत ठेविलें होतें. तेव्हां अपेक्षित भेट—कंप सौम्यसाच झाला आणि पुढें त्यांतली चिंता निघूनहि गेली.

या आमच्या घराच्या खिडकीसमोरच आठवले यांचें लांकडी सुतारकामाचें दुकान होतें. दोन बंधूंपैकीं वडील बंधू काम करीत. त्यांचें चित्र माझ्या डोळ्यांसमोर आहे. धाकटे बंधू म्हणजे या दासगणूचरित्राच्या लेखकांचे भावी तीर्थरूप दामुअण्णा आठवले. हे दामुअण्णा दुकानीं अधून-मधूनच असावे. येथेंच बुवा आणि दामुअण्णा यांची ओळख झाली आणि उभयतांच्या आयुष्यांत दैवानें एक नवीन पण मनोरम असा अध्याय रचिला. त्याचें दिग्दर्शन या ग्रंथांत अनुषंगानें आलें आहे.

## तो अद्भुत देखावा

१९१० त मी बी. ए. ची परीक्षा दिली, आणि कायद्याच्या अभ्यासाचें निमित्त करून मुंबईस सरकारी लॉ स्कूलमध्यें दाखल झालों. एक वर्षा दीड वर्षांत मला वाटतें माझी आणि बुवांची गांठ पडली नव्हती. १९०८ ते १९१० या काळांत बुवा पुण्यास वारंवार येत. दीर्घ मुक्काम करीत. तो योग यावेळीं विरळ झाला होता. तोंच मुंबईच्या दैनिकांत एक दिवस वार्ता वाचली कीं, श्रीदासगुण यांचें कीर्तन धुरंधर (?) यांच्या दिवाणखान्यांत आहे. तुकारामबुवांवरचें आपलें आख्यान बुवांनीं लावलें होते. बुवांची साधी, रसार्द्र प्रेमळ वाणी, तीं त्यांचीं भक्तिरसानें थबथबलेलीं पदें, दामुअण्णांचा पहाडी पण मधुर खडा आवाज, सारा प्रसंग केवळ अविस्मरणीय! घरीं असतांना कविता वाचन चर्चा आमची पुष्कळ होई. परंतु कीर्तन श्रवणाचा योग मला हा पहिलाच आला! काय अद्‌भुत देखावा! सारे श्रोते तुडुंब भक्तिरसांत बुडून तल्लीन झालेले. साधें सात्त्विक कीर्तन. कृत्रिम नाटकीपणा त्यांत कांहीं नाहीं. बुवांचा आवाज जात्या म्हटलें तर खरखरीत. पण भक्तीचा जिव्हाळा मोठा आणि जातिवंत. त्यामुळें दासगणूंच्या सात्त्विक कीर्तनांची उंची आपोआप मोठी दिसून येई आणि श्रोते सारे भक्तिप्रेमानें हेलावून जात! हा अनुभव मुंबईत पाहिला आणि पुढेंहि मला जे थोडे प्रसंग आले त्यांतहि पाहिला. दामुअण्णा साथीला बहारीचा रंग भरीत. पुढें किसन, छगन वगैरे मंडळींनीं कांहीं कमी केलें नाहीं. भक्तिप्रेमाचा असा उठावदार आणि प्रभावी कीर्तनकार माझ्या पाहण्यांत क्वचित्‌च आला. मी कीर्तनाचा हव्यासी नव्हे कीं परमार्थाची वाटचाल करणारा नव्हे म्हणून माझी साक्ष माझ्या पुरतीच खरी, परंतु मला इतर शेंकडोंच्या तोंडी साक्षी ऐकण्यास मिळाल्या. त्यांचा मेळ पाहून माझा अभिप्राय पक्का व योग्य ठरला.

तेथून पुढें श्रीसाईबाबांचें शिरडी संस्थान आणि श्रीदासगणू महाराजांचा लौकिक दिवसेंदिवस अधिकाधिक विश्रुत होत गेला.

श्रीदासगणू यांनीं केलेली प्रचंड काव्य-रचना आणि तिचें स्वरूप किंचित् जरी अवलोकन केलें तरी **संतकवि** ही पदवी त्यांस यथार्थपणें लागू होते. मला तर '**संतकवि**' पदावर त्यांच्याइतका प्रबळ अधिकार महिपतीनंतरच्या काळांत कोणाचा सिद्ध होईल असें यथार्थपणें वाटत नाहीं.

पारमार्थिक आणि भक्तिपर ओवीबद्ध रचनेचा जुना ओघ सांप्रतच्या काळीहि वाहता आहे. हें सूक्ष्मपणें पाहणाऱ्यांना दिसून येईल. विविध प्रकारची असली रचना मराठींत गेल्या शतकांत पुष्कळ झालेली आहे. तिचा थोडाफार परिचय मला जो वडला आहे, त्याचें स्मरण ठेवू-नहि आधुनिक संतकवि मंडळींत अग्रगण्य-पदीं दासगणूंची स्थापना करण्यास मला कसलाहि संकोच वाटत नाहीं.

## रंगदार पूर्वायुष्य

श्रीसंतकवि दासगणू यांचें चरित्रहि मोठें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. मोठ्या प्रसिद्ध कुळांत जन्म प्राप्त होऊनहि बालवय सर्व हूडपणांत घालविलें आणि मानखंडनेचे धनी झाले. पुष्कळदां असें घडतें. मनाला होणारा हा दंश सर्व चरित्र उलटवितो. दासगणूंचें तसेंच झालें. तें स्वतंत्र जीवनाला लागले; आणि अखेर पोलिस बनले. भागाला आलेलें पोलिसपण त्यांनीं कसें शोभविलें, आपलें सत्त्व कसें राखलें, कान्ह्या भिल्लाच्या तपासासाठीं रामदासी वेश कसा राबविला, वगैरे कथाभाग भावी चरित्राशीं तुलना करितां मोठाच विस्मयकारक वाटतो. या काळांत पोलिसी वेषाला शोभेल असा तमाशाचा रंग खेळण्याचाहि योग होता. आमच्या पुण्याच्या सहवासांत आपल्या पूर्वायुष्यांतील तमाशासंबंध वर्णीत होते. पुण्यांत कोण्या एका फडाच्या भिंतीवर जाहिराती फडकल्या होत्या होत्या. तिकडे बोट दाखवून बुवा मला म्हणाले, 'आज आमची लावणी पुण्यांत झडणारसें दिसतें. आपण रचून दिलेली बी. ए. ची लावणी या फडाची ठेवणींतली विजयी लावणी आहे.'

याच आयुष्यांत गुरु श्रीवामनशास्त्री इस्लामपूरकर ( मराठी बृहत्कथाकार ते हे नव्हते ) यांचा अनुग्रह कसा घेतला आणि पुढें डफ फोडून तमाशाशीं घटस्फोट कसा केला तो सर्व कथाभाग चरित्रांत आहे. तो वाचनीय आहे. आपल्या या संतकवींचा मानसिक विकास कसा होत चालला होता, त्याचीं प्रत्यंतरें आपणांस याप्रमाणें न्याहाळतां येतात. महाराजांनीं आपली मनवाणी सर्व संतसेवेला आणि परमार्थाला वाहिली. ही संतसेवा किती भरदार झाली त्याचा पुरावा या संतकवीचा काव्यसागर प्रत्यक्ष देतो. तेथें अन्यथा कोणाच्या भलावणीची गरज काय ?

श्रीदासगणूमहाराजांचें वय आतां नव्वदाजवळ पोंचत आलें आहे.

श्रीदासगणूमहाराज हे एक नैष्ठिक परमार्थी आहेत यांत तर शंकाच नाहीं. परंतु परमात्म्याचा ध्यास मनास लावीत असतां आपल्या विचाराला सूक्ष्म आणि व्यापकपणाची बैठक त्यांनीं कशी दिली

( पान ५१ वर पहा )





# श्री साई गाथामृत

ना. वा. गुणाजी

## भक्तसखा शामा

पहिल्या प्रकरणांत श्री. राधाकृष्णामाई यांची कथा सांगण्यांत आली. आतां या प्रकरणांत श्रीसाईबाबांचे अत्यंत निकटवर्ती भक्त श्री. माधवराव देशपांडे ऊर्फ शामा यांची मनोरंजक आणि उद्बोधक कथा ऐका.

**माधवरावांची योग्यता किंवा अधिकार.** अर्जुन जसा श्रीकृष्णाचा भक्तसखा, तसाच किंवा त्याहून कांकणभर अधिक माधवराव ऊर्फ शामा हा श्रीसाई-बाबांचा प्रिय भक्तसखा. कित्येकांना हें विधान अतिशयोक्तीचें आहे असें वाटेल, पण तें तसें नसून वास्तविक सत्य आहे. याचा पुरावा श्रीबाबांच्याच शब्दांत देतां येण्याजोगा आहे, तो असा —

भक्तश्रेष्ठ हरी सीताराम ऊर्फ काकासाहेब दीक्षित यांचा ज्येष्ठ पुत्र बाबू याचा व्रतबंध नागपुरास करण्याचें ठरलें होतें. तसेंच भक्तावतंस नानासाहेब चांदोरकर यांच्या ज्येष्ठ पुत्राचा विवाह ग्वाल्हेर येथें करण्याचें ठरलें होतें. तेव्हां हे दोघेहि सद्भक्त श्री बाबांना या मंगल कार्यासाठीं आमंत्रण देण्यासाठीं शिरडीस आले आणि त्यांनीं समक्ष स्वतः बाबांना आमंत्रण दिलें. त्यावेळीं श्री बाबांनीं दोघांनाहि एकत्र असें उत्तर दिलें कीं—'माझ्या श्याम्यास नेई संगती.' तेव्हां बाबांचे प्रतिनिधि म्हणून माधवराव व्रतबंध व विवाह कार्याला गेले आणि तेथें त्यांचा योग्य असा सत्कार करण्यांत आला.

एकदां काकासाहेब दीक्षित फार गर्दीवरून बाबांकडे द्वारकामाईत आले. काका, तुला काय पाहिजे असें बाबांनीं विचारतां काकासाहेब म्हणाले—'बाबा आपला सहवास असावा.' तेव्हां, बाबांनीं उत्तर दिले कीं —'ह्या श्याम्याला किनई आपलेंजवळ असूं दे, म्हणजे मी जवळ आहे.' ह्यानंतर काकासाहेब माधवरावांना होतां होईल तों आपलेजवळ ठेवीत, मुंबई, खांडवा, नागपूर वगैरे ठिकाणीं आपल्याबरोबर नेत. त्यांनीं आपल्या वाड्यांत त्यांना राहण्यास जागा दिली. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ते त्यांना देवाप्रमाणें वागवीत.

**जन्म, बालपण, शिक्षण वगैरे.** माधवरावांचा जन्म यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण कुळांत १८८० इसवी, शके १७८२ मार्गशीर्ष शु॥ पंचमी या दिवशीं अहमनगरजिल्ह्यांत, संगमनेर तालुक्यांत, शिरडीहून पश्चिमेस वीस मैलांवर असलेल्या निमोण गांवीं झाला. माधवरावांच्या मातुश्री ह्या त्यांच्या वडिलांचें चवथें कुटुंब. पहिल्या तीन कुटुंबांना संतति झाली नाहीं म्हणून शिरडीचे लक्ष्मणमामा कुलकर्णी यांच्या भगिनीशीं त्यांनीं चवथें लग्न केलें. माधवराव हें त्यांचें पहिलेंच अपत्य. माधवरावांच्या जन्मानंतर तिसरेच वर्षी त्यांचे वडील सहकुटुंब सहपरिवार निमोणहून शिरडीस कायमचे रहावयास आले. माधवरावांचें शिक्षण शिरडीसच झालें. ते मराठी ५–६ इयत्ता शिकले होते. त्याना संस्कृताचा किंवा इंग्रजीचा गंधहि नव्हता. त्यांचे वाणीस संस्कृताचा किंवा उच्च मराठी शिक्षणाचा संस्कार बिलकुल नसल्यामुळें आणि त्यांचें सर्व आयुष्य शिरडीसारख्या खेडेगांवांत गेल्यामुळें आणि तेथील अशुद्ध बोलणाऱ्या मंडळीच्या सहवासांत असल्यामुळें त्यांच्या बोलण्यांत अशुद्ध गांवठी शब्दप्रयोग नेहमींच ऐकूं येत.

**स्थावर मिळकत व वतन**—शिरडींत त्यांच्या मालकीचें लहानसें खेडेगांवीं थाटाचें घर आहे. निमोण, शिरडी वगैरे ठिकाणीं त्यांची जमीन आहे. हे निमोणचे वतनदार देशपांडे असल्यामुळें त्यांना देशपांडे हक्काची रोकड रक्कम संगमनेर, कोपरगांव व सिन्नर तालुक्यांतून मिळत असे. माधवराव हे ज्येष्ठ, त्यांना दोन धाकटे बंधु (१) काशीनाथ बळवंत, (२) बापाजी बळवंत होते. काशीनाथ यांना दत्तक दिले होते. त्यांचें तेथील नांव गणेश श्रीधर. हे सर्व बंधु विभक्त असून दोघांचा परिवार शिरडीस आणि तिसऱ्याचा इतरत्र आहे.

**संतति**—माधवरावाचीं दोन लग्नें झालीं. पहिल्या पत्नीचें नांव सौ. सावित्रीबाई. त्यांना एक पुत्र एकनाथपंत नांवाचा असून त्याला बरींच मुलेंबाळें आहेत. त्याच्या पत्नी निमगांव निमोणचे गोपाळ कचेश्वर कुळकर्णी यांची कन्या. ते पब्लिक वर्क्स खात्यांत नोकरी करीत असत. माधवरावाच्या दुसऱ्या कुटुंबाचें नांव सौ. द्वारकाबाई. त्यांना जगन्नाथपंत व उद्धवराव असे दोन मुलगे आणि सौ. बबीताई अशी तीन अपत्यें आहेत. यांची लग्नें झालीं असून त्यांना मुलेंबाळेंहि झालीं आहेत.

**शरीर प्रकृति.** माधवरावाचें शरीर धिप्पाड, शरीराची काठी उंच व मजबूत,

वर्ण काळासावळा निमगोरा, प्रकृति निकोप असून त्यांचा आहार चांगला व सात्विक असे. वयाच्या ७२ व्या वर्षांपर्यंत त्यांना कधींहि ताप आला नाहीं किंवा त्यांचें डोकें दुखलें नाहीं.

**धर्म, आचार व आहार.** माधवराव हे सनातनी हिंदु धर्माचे असून त्यांना आपल्या धर्माबद्दल फार अभिमान असे. खाण्यापिण्यासंबंधीं त्यांचें आचरण शुद्ध, नियमबद्ध व कर्मठ असें होतें. कांहीं नेमक्या घरांशिवाय ते कधीं कोणाकडे जेवत नसत. त्यांना उत्तम स्वयंपाक करितां येत असल्यामुळें ते स्वतः हातानें स्वयंपाक करून जेवत असत. त्यांची भूक नेहमीं खरमरीत असून अग्नि प्रदीप्त असे.

**उदर निर्वाह, नोकरी व वैद्यकी**- माधवराव हे तरुणपणीं कांहीं वर्षें शिरडीच्या शाळेंत दुय्यम किंवा असिस्टंट मास्तराचें काम करीत असत. नंतर कांहीं वर्षें त्यांनीं बाबांच्या परवानगीनें शिरडीहून ३।४ मैल असलेल्या अस्तगांव नांवाच्या गांवची पाटीलकी केली. नंतर मरेपर्यंत वैद्यकी केली ते नेहमीं बाबाचें नांव घेऊन औषध देत व औषधांत बाबांची उदी घालीत बाबांच्या कृपेनें त्यांचे हातास नेहमीं यश येई. त्यांना नाडी परीक्षा चांगली असे. मोठमोठ्या नामांकित डॉक्टर वैद्यांनीं हात टेकलेले रोगी ते बाबाचें नांव घेऊन बरे करीत. त्यांना रोगांची आणि औषधांची चांगली माहिती असे. ते कोणाजवळ वैद्यशास्त्र शिकले नव्हते. पण आर्यवैद्यकाची पुस्तकें वाचून आणि बाबांच्या मुखांतून आलेलीं नानाप्रकारच्या रोगांवरील औषधें लक्ष्यांत ठेवून ते वैद्यकीचा धंदा करीत. पनवेलच्या पुराणिकाच्या कारखान्यांतील आणि चेंबूर येथील सांडू बंधूच्या कारखान्यांतील औषधें मागवून तीं वापरीत आणि स्वतः कांहीं तयार करीत.

माधवराव असिस्टंट शिक्षकाचें काम करीत असल्यावेळीं, त्यांचेवर लक्ष्मण मास्तर म्हणून एक इसम होते आणि नानारत्नपारखे हे हेडमास्तर होते. त्यांचा वर्ग द्वारकामाई (मशीद) समोर असें श्री. गुंड सर्कल इन्स्पेक्टर यांनीं बांधलेल्या, कांहीं दिवस श्रीराधाकृष्णमाई राहत असलेल्या आणि शेवटीं बाबांच्या शामसुंदर वारूचें निवासस्थान असलेल्या लहानशा घरांत असे. त्यावेळीं हें घर विटामातीचेंच होतें. श्री. द्वारकामाईस लागून असलेल्या भिंतीस एक खिडकी असे आणि तेथेंच माधवरावांची बसण्याची जागा असे. तेथून श्रीद्वारकामाईत बसलेल्या बाबांचे सर्व व्यवसाय किंवा व्यापार त्यांना दिसत असत.

**बाबांची सत्संगति आणि निकट व दीर्घ सहवास**—माधवराव वयाच्या १४।१५ वर्षीं शिक्षकांचें काम करीत असतां बाबा शिरडीस आले. ते माधवरावांचे देखतच आले त्यावेळीं माधवराव बाबांना एक धुनी लावून मशीदींत बसणारा व नेहमीं चिलीम फुंकणारा १९–२० वर्षांचा तरुण वेडसर फकीर आहे इतकेंच मानीत असत. बाबा हे सिद्ध आहेत, संत आहेत, देव आहेत ही भावना त्यांना मुळींच नव्हती. बाबा मशीदींत आल्यापासून माधवराव दिवसांतून बरेच वेळां त्यांचेकडे फक्त चिलीम ओढण्याकरितां म्हणून जात असत.

माधवरावांचीं पहिलीं १०।१२ वर्षें बाबासंबंधीं अशाच भावनेंत गेलीं. पुढें